म. ग्रं. सं. ठाणें
भू-प्रवास
१६४
१९२८

REFBK-0003791

REFBK-0003791

॥ श्री काशीविश्वेश्वराय नमः ॥


[illegible]-प्रवास

अथवा

# काशी-यात्रा.


लेखिका:—सौ० अन्नपूर्णाबाई [illegible]कर.

म. ग्रं. मं. ठाणें



श्री काशीविश्वेश्वराचें मंदिर.

# त्रिवेणीसंगम, प्रयाग.




या ठिकाणीं गंगा ही थोडी पश्चिम वाहिनी होऊन यमुनेला मिळते. सरस्वती ही नदी खालून गंगा व यमुना यांच्या संगमास वर उचलते. गंगेचें पाणी शुभ्र, यमुनेचें काळें व सरस्वतीचें किंचित् लालसर अशा तीन निरनिराळ्या रंगांच्या पाण्यांचें हें संमिश्रण पाहण्यास फार आनंद वाटतो. वेणीदान याच संगमांत करितात. [पृष्ठ. ३६.]

॥ श्री काशीविश्वेश्वराय नमः ॥

# आमचा त्रिस्थळीचा प्रवास

अथवा

# काशी-यात्रा.

गोष्टीच्या रूपानें लिहिलेलें नकाशासह सचित्र वर्णन.

( यांत प्रवासांत येणाऱ्या अडचणी, त्या निवारण करण्याचे उपाय, यात्रेंतील आवश्यक धर्मकृत्यें, त्यांस व प्रवासास लागणारा खर्च, तेथील पवित्र व प्रेक्षणीय स्थळें यांचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. )

लेखिका:—

सौ० अन्नपूर्णाबाई सुगवेकर.

(एक प्राथमिक शिक्षकीण)

प्रकाशक:—

गंगाधर मोरेश्वर सुगवेकर

(एक प्राथमिक शिक्षक)

मु० कुर्ला, जि० मुंबई उपनगर.

सन १९२८ इसवी.

REFBK-0003791

REFBK-0003791

किंमत आठ आणे.

[ पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन आहेत. ]

मुद्रकः—श्री० मोरेश्वर चिंतामण लेले, बी. ए.,
मॅनेजर, विक्रम प्रिंटिंग प्रेस, खटाव बिल्डिग, मुंबई नं. ४.

म. अं. ... कार्य.

श्री.

# या पुस्तकावरील निवडक अभिप्राय.

"आमचा त्रिस्थळीचा प्रवास." या पुस्तकाची हस्तलिखित प्रत समग्र वाचून पाहिली. प्रस्तुत पुस्तकांत एका श्रद्धाळू दांपत्यानें तेरा दिवसांत केलेल्या यात्रा-प्रवासाचें वर्णन केलेलें आहे. वर्णन त्रोटक आहे, परंतु त्यांत यात्रेकरूंच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दाखवून त्यांस मार्गदर्शी होण्यास तें पुरेसें आहे. पवित्र क्षेत्रांच्या ठिकाणीं यात्राप्रसंगानें जाणाऱ्या श्रद्धाळू मनुष्याच्या मनांत अश्रद्धा उत्पन्न करण्यासारखे किळसवाणे प्रकार आपल्या धर्माचार्यांच्या हातून व्हावे, हें लांछनास्पद नव्हे काय ? या गोष्टी आपल्या धार्मिक बाबतींत पुढाकार घेणाऱ्यांच्या लक्षांत कधीं येणार ! त्याचप्रमाणें रेलवेनें प्रवास करितांना यात्रेकरूंचे फार हाल होतात, इकडे अधिकारी वर्गाचें लक्ष कधीं जाणार ? असे प्रश्न पुस्तक वाचून डोळ्यासमोर उभे राहतात. पण हे प्रकार पाहून किंवा रेलवेचा त्रास सोसून शेंकडों यात्रेकरू स्वस्थ बसतात. तसें न करितां प्रस्तुत पुस्तकांत ते लोकांच्या पुढें मांडण्याचा व्यवस्थित प्रयत्न झाला आहे; आणि हाच खरो-खर हे प्रकार नाहींसे करण्याचा मार्ग होय. या योगानें लोकजागृति होऊन त्यावर उपाय-योजना आज नाहीं उद्यां होईल, अशी आशा बाळगण्यास जागा आहे. आणि याच करितां ग्रंथकर्त्रीचें अभिनंदन करावें, असें मला वाटतें.

पुस्तकाची भाषा सुबोध आहे. कांहीं ठिकाणीं वर्णनाच्या ओघांत भाषा प्रौढ व गंभीरही भासते.

सौ॰ अन्नपूर्णाबाई यांनीं पतीसह त्रिस्थळीची यात्रा करून धार्मिक दृष्ट्या संपादन तर केलेंच; परंतु एवढ्यावरच न थांबतां आपल्या

अनुभवाचा लाभ पुस्तकरूपानें इतरांना देण्याची व्यवस्था करून त्यांनीं समाजसेवेचें पुण्यही साधलें याबद्दल त्या स्तुतीस पात्र आहेत.

पुस्तकास रेल्वेमार्गांचा नकाशा जोडल्यानें त्याच्या उपयुक्ततेंत भर पडली आहे.

प्रो. रानडे यांचा बंगला.
कुर्ला.
१०-२-२८

**महादेव गणेश काळे, एम्. ए.;**
प्रोफेसर, नॅशनल मेडिकल कॉलेज, मुंबई.

(२)

प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखित प्रत, लेखिकेचे पति श्री. सुगवेकर यांनीं मला वाचावयास दिली. आधींच प्रवास-वर्णनपर विषय, त्यांत काशीसारख्या अत्यंत पवित्र स्थळांच्या यात्रेची स्वानुभविक माहिती, आणि तीही सुंदर भाषेंत प्रतिपादन केलेली असल्यानें पुस्तक कोणाही महाराष्ट्रीयास वाचनीय झालें आहे. अजूनपर्यंत काशीयात्रा वर्णनपर पुस्तक मराठींत छापून प्रसिद्ध झालेलें आढळण्यांत येत नाहीं. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांस काशीयात्रेस निघण्यापूर्वी ह्या पुस्तकाचें वाचन अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक होईलसें वाटतें. काशीचें पवित्र स्थान आपणां लोकांस फार दूर व परप्रांतांत असल्यानें इंग्रजी पद्धतीप्रमाणें हें पुस्तक 'गाईड' म्हणून उपयोग करण्यास हरकत नाहीं. पुस्तकाची भाषा प्रौढ परंतु सामान्य जनांस सहज आकलन होणारी आहे. वर्णनाबरोबर लेखिकेनें आपले विचारही ठिकठिकाणीं प्रतिपादिले आहेत. व ते योग्य असेच आहेत. एकंदरींत पुस्तक संग्रहणीय झालें असून वाचनालयें व भावी यात्रेकरू यांस, तसेंच शाळांमध्यें बक्षिस देण्यास तें अत्यंत योग्य झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कुर्ला,
ता. १ फेब्रुआरी १९२८

**विनायक त्र्यंबक भातखंडे,**
बी. ए., एल्‌एल्. बी.
हेडमास्तर, कुर्ला म्युनि. ऍं. व्हॉ. स्कूल.

# प्रकाशकाचें निवेदन.



या पुस्तकांतील दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें माझ्या कुटुंबानें हें पुस्तक लिहून तें प्रसिद्धीकरितां माझ्या हातीं दिलें, तिनें आपलें काम निश्चयाप्रमाणें तडीस नेलें. पण मला मात्र विवंचनाच पडली. लिहिलेलें पुस्तक मीं वाचून पाहिलें. मला तें पसंत पडलें. म्हणून तें मीं माझ्या इतर व्यवसायबंधूंस दाखविलें. त्यांनाही तें आवडलें. त्यावरून धीर धरून मीं तें पदवीधर विद्वानांपुढें ठेविलें. त्यांनाही तें पसंत पडून त्यांनीं आपले अभिप्राय लिहून दिले. पण द्रव्यसामर्थ्याच्या अभावीं ही कृति पुस्तकरूपानें समाजापुढें येण्याची मला आशा नव्हती.

कारण, माझें कुटुंब व मी अशीं उभयतां प्राथमिक शिक्षकांतील सामान्य दर्जाचीं व निर्वाहापुरती प्राप्ति मिळविणारीं माणसें आहोंत. आणि प्राथमिक शिक्षक, पैसा व पुस्तकप्रकाशन हे परस्पर विरुद्ध असणारे शब्द आहेत. अर्थात् या शब्दत्रयींचें व आपलें पटावयाचें नाहीं, म्हणून बरेच दिवस मी स्वस्थ होतों.

पण श्रमांचा थोडा तरी मोबदला मिळावा म्हणून एकाद्या मासिकांत किंवा निदान चांगल्या साप्ताहिकांत प्रसिद्धीकरितां स्थळ मिळाल्यास पाहावें, या हेतूनें मी या पुस्तकाची हस्तलिखित प्रत घेऊन प्रथम मुंबईतील ' गृहलक्ष्मी ' नांवाच्या मासिकाच्या कार्यालयांत

गेलों. बराच वेळ बाहेर बसल्यावर तेथील एक वयोवृद्ध कार्यकर्ते बाहेर आले. त्यांनीं " धार्मिक बाब आम्हांस नको. " म्हणून सांगून ते तसेच आंत गेले ! " कालाय तस्मैनमः ! " असें म्हणून मी बाहेर पडलों व त्याच पावलीं " मासिक मनोरंजन " नांवाच्या मासिकाच्या व्यवस्थापकांकडे गेलों. त्यांनीं माझा समयोचित आदर करून माझ्या कामाची विचारपूस केली. हकीकत ऐकून पुस्तक त्यांनीं ठेवून घेतलें. सात आठ दिवसांत वाचून पाहून त्यांनीं आपल्या मासिकांत "पुढील अंकापासून यांतील थोडा थोडा भाग क्रमशः प्रसिद्ध करूं." असें मला अभिवचन दिलें. याजबद्दल श्री० दत्तात्रय रघुनाथ मित्र, यांचे येथें आभार मानण्यास मला आनंद वाटतो.

" पुस्तक मासिकांत प्रसिद्ध केल्यानें त्यांतील रहस्य नाहींसें होतें, सबब तें तसें करूं नये. " असें सांगणारे माझे कांहीं हितचिंतक मला भेटले. व त्यांपैकींच एकानें " जशी जशी पुस्तकविक्री होईल तसा तसा आपला पैसा परत करावा व आपलें नांव गुप्त ठेवावें. " या दोन अटींवर छपाईपुरतें द्रव्यसहाय्य देण्याचें कबूल केलें. या अकल्पित योगायोगानें मलाही उत्तेजन आलें. त्याच वेळीं विक्रम प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री० मोरेश्वर चिंतामण लेले, बी. ए. व श्री० दत्तात्रय श्रीधर केळकर यांनींही प्राप्तीची विशेष अपेक्षा न करितां अत्यंत आस्थापूर्वक पुस्तक छापून देण्याचें व बांधणी वगैरे सर्व काम सुबक रीतीनें करून देण्याचें कबूल केलें. शेट तुकाराम पुंडलीक शेट्ये, बुकसेलर व पब्लिशर, माधवबाग, मुंबई, यांनींही पुस्तक छापविण्यास प्रोत्साहन देऊन कागद कोणता वापरावा, आकार कोणता ठेवावा व आच्छादन कोणत्या प्रकारचें घालावें, याजबद्दल वेळोवेळीं सल्ला देऊन, पुस्तकाच्या प्रती खपविण्याचें आश्वासन दिलें. श्री० पुरुषोत्तम रामचंद्र लेले, बी. ए. एल्एल. बी. यांनीं आपला

अमोलिक वेळ खर्च करून, माझ्या कुटुंबाची ही लहानशी कृति कुतूहलपूर्वक वाचून पाहून, त्यास प्रस्तावना लिहून देऊन आपलें " पुरुषोत्तम " नांव सार्थ केलें. प्रो० महादेव गणेश काळे, एम्. ए. व विनायक त्र्यंबक भातखंडे, बी. ए., एल्एल्, बी. यांनीं आपले अभिप्राय लिहून दिले. श्री० मुरलीधर काशीनाथ खेडकर यांनीं चित्रें मिळवून दिलीं. श्री० वैद्य ब्रदर्स यांनीं वर्णनावरून ड्राइंग काढून चित्रांचे ब्लॉक तयार केले. श्री० गणेशभट भागवत, उपाध्ये प्रयाग, यांनीं पत्रद्वारें माहिती पुरविली. माझे उपशिक्षक श्री० मोरेश्वर गजानन कानडे व श्री० हरी जनार्दन सुंडले या उभयतांनीं प्रुफें काळजीपूर्वक तपासलीं, याखेरीज आरंभापासून शेवटपर्यंत प्रत्येक कामांत निरपेक्ष साह्य देऊन तें काम विशेष आस्थापूर्वक करून दाखवून, मला आपली आत्मीयता पटविली.

याखेरीज या लहानशा पुस्तकाचे श्रमविभागाचे वांटेकरी अनेक आहेत. त्या सर्वांचे व उपरीनिर्दिष्ट सद्‌गृहस्थांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानितों. माझी शक्ति नसतांना हें पुस्तक देवदयेनें प्रसिद्ध झालें आहे. त्यांतील मजकूर जरी गोष्टीच्या रूपानें लिहिलेल्या प्रवासावर आहे तरी त्यांतील शुद्ध भावना धार्मिक तत्त्वावरच आहे, यामुळें धार्मिक भावनेवर मिळणारा पैसा मिळविण्याची माझी इच्छा नसून ती मिळकत धर्मकार्यांतच खर्च व्हावी, या हेतूनें या पुस्तकाच्या विक्रींत–झालेला खर्च वजा जातां–होणारा सर्व नफा, " **अनाथ-विद्यार्थी-गृह, पुणें** " या संस्थेस अर्पण करण्याचा संकल्प मी येथें करीत आहें.

शेवटीं, दिव्यदृष्टीसही अगोचर अशा विशाल वाङ्मयक्षेत्रांत माझ्या कुटुंबानें टाकिलेलें पहिलें पाऊल सहृदय वाचकांस आनंद देवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून, ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध अशा सुज्ञांस व तज्ज्ञांस


नम्रपणें विनंति करितों कीं, त्यांनीं या पुस्तकांत त्यांस आढळणारे दोष कृपा करून कळवावे. छापतांना कांहीं अपरिहार्य अडचणी आल्यामुळें या पुस्तकांत शुद्धलेखन दृष्ट्या कांहीं स्थळीं दोष राहून गेले. पण या आवृत्तींत ते आतां निघण्याचा इलाज नसल्यामुळें, त्याबद्दल सुज्ञ क्षमा करतील, अशी आशा बाळगितों.

ईशेच्छेनें या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघण्याचा योग आल्यास, या सर्व दोषस्थळांचा विचार अवश्य करीन. या पुस्तकांत लिहिलेले रेलवेच्या तिकिटांचे दर कायम राहाणारे नाहींत. पुस्तकाच्या छपाईचें काम चालू असतांना हे दर थोडे उतरत आहेत, असें समजलें. लांबच्या प्रवाशास त्यामुळें बराच फायदा होण्याचा संभव आहे.

मु० कुर्ला, जि० मुंबई उपनगर<br>तारीख १० मार्च १९२८

प्रकाशक,<br>गंगाधर मोरेश्वर सुगवेकर.

# हद्गत.



प्रवासवृत्तें हीं नेहमींच चित्ताकर्षक असतात. त्यांतील रमणीयता विविध असते. इतिहास-कथन हें जेवढें सत्यास धरून असतें. तेवढेंच प्रवासवृत्तही सत्यास धरून असतें. कादंबरीप्रमाणें यांत अतिशयोक्ति किंवा काल्पनिक भाग शोभत नाहीं. कोणीं तो घालण्याचा प्रयत्न केल्यास तें सत्कथन न होतां उलट रसोभंग मात्र होतो. अशा सुमधुर प्रवास वृत्तांत काशीयात्रेसारखें नितांत रमणीय व पुण्यपावन प्रदेशांतील प्रवासाचें वर्णन या पुस्तकांत मीं गोष्टीच्या रूपानें यथामति केलेलें आहे.

क्षेत्रांच्या ठिकाणीं त्या त्या क्षेत्रांचीं महात्म्यें असतातच. पण तीं संस्कृतांत असतात. त्यांत त्या त्या ठिकाणच्या प्रत्येक देवाची व देवतेची ओतप्रोत स्तुति असते. प्रस्तुत कालीं सामान्य जनांस या महात्म्यांचा उपयोग होत नाहीं. तशा रीतीनें वागण्याचें मनांत आणल्यास विपुल द्रव्यसामर्थ्य व सुकाळाचा वेळ यांची उणीव असतां कामा नये. ज्यांना अनुकूलता असेल ते त्या प्रमाणें करतीलच. पण माझा हा लहानसा प्रयत्न अशा थोर विभूतींकरितां नसून सामान्य जनांस तो मार्गदर्शक व्हावा, एवढ्याकरितांच आहे. त्यांना, आपणांस कोठें कसें जावयाचें ? त्यांस खर्च किती येतो ? तेथें आवश्यक धर्मकृत्यें कोणतीं ? प्रेक्षणीय स्थळें कोणतीं ? हरकती कोठें कोठें व

कशा कशा येतात ? त्यांचें निरसन कसें करावें ? इत्यादि प्रश्न मनांत सहज उद्भवणारे असतात. या प्रश्नांचाच मला जो अनुभव आला, तोच मीं या लहानशा पुस्तकांत सांगितलेला आहे.

॥ देवांत विश्वेश पुरींत काशी ॥ नदींत गंगा भव–मृत्यु नाशी ॥
असोनि ऐसें त्रय एक ठाया ॥ कां व्यर्थ हे तापविती स्वकाया ॥

असें ज्या काशीपुरीचें वर्णन विद्वानांनीं केलेलें आहे, त्या काशीयात्रेसंबंधानें विद्वज्जनांनीं आपल्या अलौकिक बुद्धि–सामर्थ्यानें व आपल्या अमोघ वाणीनें लिहिलेले ग्रंथ अनेक असतील, पण विषयाची समज सहज पटेल, असें एकही लहानसें पुस्तक आम्हांस आढळलें नाहीं. तेथें गेल्यावर द्रव्यार्जनाच्या चिंतेंत निमग्न असणारे तीर्थोपाध्ये आपणांस त्या त्या क्षेत्रांतील दर्शनेंही सांगत नाहींत, मग दाखविण्याची तर गोष्टच नको. या अडचणी या लहानशा पुस्तकानें दूर होतील, असा मला आत्मविश्वास आहे.

संसार–यात्रा ही लौकिकांत राहाणाऱ्या मनुष्याच्या मागें अहर्निश लागलेली आहे, त्यांत होणारे त्रिविध ताप दूर होण्यास परमेश्वरभक्ति हाच एक सदुपाय आहे, असें साधु–संत सांगतात. “ प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ” घरीं राहून करणारे पुण्यात्मे कोणी असतील, तरीपण त्यांचीं मनें संसार–पाशांत गुंतलेलीं असणारच. कांहीं दिवस तरी या उपाधींतून मोकळे राहून मनःस्वास्थ्य मिळावें व त्या योगानें अहर्निश ईशचिंतन घडावें, याशिवाय ठिकठिकाणचें नाविन्य, सृष्टिसौंदर्य, लोकस्थिति, राहाणी आणि प्राचीन व अर्वाचीन स्थितींतील कालमानानें पडणारे फरक इत्यादि चमत्कार पाहून मनास आनंद व्हावा हेच यात्रा करण्याचे उद्देश असावे, असें मला वाटतें.

या पुस्तकांत आमचा ज्यांच्या ज्यांच्याशीं संबंध आला, त्या त्या सद्गृहस्थांचीं नांवें मीं त्या त्या प्रसंगापुरतीं त्यांच्या परवानगीवांचून घातलीं आहेत. पण तीं सत्कथनार्थ घालावीं लागल्यामुळें, त्याजबद्दल ते रुष्ट न होतां उलट आपलें समाधान असल्याचेंच व्यक्त करतील, अशी मी आशा करितें.

आर्यस्त्री नात्यानें पतिदेवांची आज्ञा शिरसामान्य करुन मीं ही केलेली ईशसेवा व जनसेवा विद्वज्जन समूहाच्या अभिरुचीस गोड लागो व "हंसक्षीर" न्यायानेंच ते माझ्या या अल्पतर कृतीकडे पाहाण्याची कृपा करोत, अशी माझी त्यांना विनंती आहे. पुस्तक प्रकाशनाच्या कामीं ज्या ज्या सुजनांची जी जी मदत झालेली आहे, त्या मदतीबद्दल त्या त्या सज्जनांचे माझ्या पतींप्रमाणेंच मीही आभार मानितें.

मु० कुर्ला, जि० मुंबई उपनगर<br>तारीख १ मार्च १९२८

लेखिका,<br>सौ० अन्नपूर्णाबाई सुगवेकर.

# प्रस्तावना.

धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । असें संस्कृत वचन आहे. याचा अर्थ वाचकाच्या वृत्तीप्रमाणें करतां येतो आणि याच्या निरनिराळ्या अर्थाप्रमाणें यात्रेसंबंधीं निरनिराळीं मतें असूं शकतात. अमुक पर्वतावरील अमुक गुहेंत धर्माचें तत्त्व झांकून ठेवलेलें आहे असा ज्याचा विश्वास आहे त्याला तें तेथें गेल्याशिवाय सांपडणार नाहीं. विठोबाचें दर्शन घ्यावयास पंढरपूरलाच गेलें पाहिजे; दत्तात्रेयाला पाहण्यासाठीं गाणगापूर गांठलें पाहिजे; विश्वेश्वराला पोंचावयाचें असेल तर प्रथम काशीला पोंचलें पाहिजे. या ज्या समजुती आहेत त्यांच्या पायाशीं असा विश्वास असतो. उलटपक्षीं वरील संस्कृत वचनाचा अर्थ "धर्म आपल्याच हृदयरूपी गुहेंत असतो इतर ठिकाणीं कोठेंहि सांपडावयाचा नाहीं." असा करणारास यात्रा परमेश्वर प्राप्तीच्या उपयोगी पडतील असें वाटत नाहीं. मी स्वतः या दुसऱ्या मताचा आहें.

तरी पण प्रवासाची उपयुक्तता मात्र मला फारच मोठी वाटते. "केल्यानें देशाटण" हें देशदेशींचें ज्ञान मिळवण्याचें सर्वांत उत्तम साधन आहे. एकाच ठिकाणीं रहाणाराची वृत्ति विहिरींतील बेडकासारखी होते. दृष्टि जरा विस्तृत करावयाची असेल तर निरनिराळे देश पाहिले पाहिजेत. आपल्यापेक्षां निराळ्या चालीरीतींचे, निराळ्या पेहरावाचे, निराळ्या पंथाचे लोक पाहिल्याशिवाय परमेश्वराच्या अतुल सामर्थ्याची खरी प्रचीति येणार नाहीं. आपल्या स्वतःच्या अंगचे निरनिराळे गुणसुद्धां आपणांस अपरिचित परिस्थितींत गेल्याशिवाय नीटसे समजत नाहींत. निराळ्या प्रांतांत गेलें असतां तशी अपरिचित परिस्थिति सांपडते. या दृष्टीनें पाहतां प्रवासाची आवड लोकांत उत्पन्न व्हावी म्हणूनच जणूकाय आपल्या दीर्घदृष्टि पूर्वजांनीं ही

यात्रांची योजना केली असावी, असा तर्क केला तरी चालण्याजोगें आहे. आपल्या गांवचे थोडेसे लोक पहाण्याचीच संवय असणारास मनुष्यांचा मोठा जमाव पहाणें हें एक माणुसकीचें शिक्षणच असतें. असे जमाव हल्लीं बऱ्याच शहरांत दिसतात. पण पूर्वीं शहरांची संख्याच थोडी होती, त्या दिवसांत असे जमाव तीर्थांच्या ठिकाणीं अगर जत्रा व उत्सव होत असतील तेथें जमत असत. या दृष्टयाहि तीर्थयात्रांचा सर्वांना उपयोग आहे.

साहसाच्या अभावीं समाज खालावत जातो. साहस वाढविण्यास अगर कायम राखण्यास प्रवास हें अगदीं सहज सुलभ असें साधन आहे. कोणच्याहि दृष्टीनें कां होईना आपल्या लोकांत प्रवासाची अभिरुचि उत्पन्न करणारा दरएक स्त्रीपुरुष समाज-सेवकच समजण्यांत आला पाहिजे. स्वतः प्रवास करून तसल्या प्रवासाची थोडीतरी आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न पुस्तक स्वरूपानें केल्याबद्दल सौ. अन्नपूर्णाबाईचें मी मनापासून अभिनंदन करतों व हा त्यांचा प्रयत्न यशस्वी होवो अशी परमेश्वरापाशीं मनापासून प्रार्थना करितों.


१९-२-१८<br>मुंबई नं. ४

**पुरुषोत्तम रामचंद्र लेले,**<br>बी. ए., एल्‌एल्‌. बी.

# आमचा त्रिस्थळीचा प्रवास अथवा काशी-यात्रा.

अनुक्रमणिका.


| प्रकरण. | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ लें. | बेत. | १ |
| २ रें. | निश्चय | ४ |
| ३ रें. | प्रयाण | ८ |
| ४ थें. | मार्गक्रमण. | १३ |
| ५ वें. | उत्तर हिंदुस्तान | १८ |
| ६ वें. | जान्हवी भेट. | २७ |
| ७ वें. | प्रयागचीं दर्शनें. | ३० |
| ८ वें. | माझें वेणीदान. | ३२ |
| ९ वें. | तीर्थराज प्रयाग | ३५ |
| १० वें. | मोक्षपुरी काशी. | ४१ |
| ११ वें. | काशींतील धर्मकृत्यें. | ४४ |
| १२ वें. | श्री काशीविश्वेश्वर दर्शन. | ४७ |
| १३ वें. | काशींतील मुख्य दर्शनें | ५२ |
| १४ वें. | काशींतील विशेष गोष्टी. | ५७ |
| १५ वें. | श्री विष्णुगया. | ६४ |
| १६ वें. | गयासुर. | ६७ |
| १७ वें | गयेंतील दर्शनें व धर्मकृत्यें | ७० |
| १८ वें. | सिंहावलोकन | ७४ |
| १९ वें. | निरोप | ७८ |







**मार्गाच्या माहितीचा नकाशा.**
(नकाशा स्केलांत नाहीं.)

| | | |
|---|---|---|
| मुंबई ते अलाहाबाद. | | ८४५ मैल. |
| अलाहाबाद ते बनारस कँटोन्मेंट. | | ७४ ,, |
| बनारस ते काशी | ... | ४ ,, |
| काशी ते मोंगलसराई | ... | ७ ,, |
| मोंगलसराई ते गया | ... | १२६ ,, |
| एकूण मुंबई ते गया | ... | १०५६ मैल |

नैनी हें ईस्ट इंडियन रेलवेचें अथवा बऱ्या लायनींचें जंक्शन स्टेशन आहे.

इझतब्रीज हें प्रयाग (अलाहाबाद) ते बनारस कँन्टोन्मेंट येथें जाण्याचें छोट्या लाइनीचें (बें. अ. नॉ. वे. रे. चें) स्टेशन आहे.

नर्मदाब्रिज येथें उतरून नावेंतून नदीपार व्हावें लागतें.

चौकी हें कलकत्ता मेलचें अलाहाबादला जाण्यायेण्याचें स्टेशन आहे. कलकत्ता मेल, कटनी–बिना या मार्गानें मुंबईकडे येते व मुंबईहून जाते.

|| श्री काशीविश्वेश्वराय नमः ||



# आमच्या त्रिस्थळीचा प्रवास.

अथवा

# काशी-यात्रा.

## प्रकरण १ लें.

### बेत.

श्रीकाशीविश्वेश्वर हें नांवच किती कर्णमधुर, किती आल्हादकारक, किती सुखदायक, किती शांतिकारक व किती मनस्तापहारक वाटतें, याची कल्पना भाविक, श्रद्धाळू व धार्मिक माणसांशिवाय इतरांस होणें अशक्य आहे.

सुमारें दोन वर्षांपूर्वी आमची कांहीं नातलग मंडळी काशीयात्रा करून आली. त्यांत माझ्या पूज्य मातुश्री व पाठचे बंधु चि. दत्तोपंत अशीं माझ्या जिव्हाळ्याचीं माणसेंही होतीं. त्यांनीं परत आल्यावर मला तिकडील देवदेवतांच्या भक्तिभावानें

ओथंबलेल्या पुण्यकारक, मनोहारक व चित्ताकर्षक अशा नाना प्रकारच्या गोष्टी सांगितल्या. प्रयाग, काशी व गया येथील तीर्थमहिमा व त्या त्या ठिकाणचे चमत्कृतिजनक देखावे, तेथील उपास्य व पूजनीय देव, लोकांची राहणी, हवापाणी व सृष्टि-सौंदर्य यासंबंधाच्या नाना प्रकारच्या हकीकती ऐकून, आपणही एकवार अशा विविध तऱ्हा प्रत्यक्ष पाहून याव्या, अशी माझ्या मनांत भावना उत्पन्न होऊं लागली. ती वाढतां वाढतां इतकी वाढली कीं, मला तिचा हृद्रोग लागतो कीं काय ? अशी मला माझ्या मनांत व तिकडच्याही मनांत धास्ती वाटूं लागली.

॥ काशीस जावें; नित्य वदावें. ॥ ही साधूक्ति सर्वश्रुत आहे. हें कडवें नेहमीं म्हटल्यानें केव्हांतरी काशीयात्रा घडते; अशी पुष्कळ भाविकांच्या मनाची समजूत असते. माझीही तशीच होती. तरी पण तिकडचें म्हणणें:—"काशीयात्रेस जाणें हें बऱ्याच खर्चाचें काम आहे; तिकडील पंडे लोकांच्या अडवणुकी फार जिकिरीच्या असतात; परदेशांत चांगल्या व खातरीच्या संगती-सोबतीवांचून जाणें चांगलें नसतें; तिकडील हवापाणी, राहणी व खाणेंपिणें या गोष्टी, आपल्या अंगवळणीं पडलेल्या इकडील परिस्थितीशीं अगदीं विरुद्ध असतात; तेव्हां अशा सर्व अडचणींतून पार पडणें, आपल्यासारख्या हलक्या प्रतीच्या नोकर माणसांकडून कठीण आहे." खरें पाहिल्यास हें तिकडचें म्हणणें अक्षरशः सत्य होतें. अशा या सर्व अडचणींतून पार पडून आमचा मनोदय कसा सफळ होणार ? ही विवंचना कांहीं दिवस माझ्या मनास विश्रांति देत नव्हती.

" पण सत्य संकल्पाचा दाता भगवान् असतो. परमेश्वराच्या चरणीं आपला अनन्यभाव, आपली निर्व्याज भक्ति व अढळ श्रद्धा असली, म्हणजे जो दयाघन प्रभु अत्यंत लहान लहान जीवजंतूंचेंही मोठमोठ्या संकटांतून रक्षण करितो, त्यालाच आमची दया आली म्हणजे आम्हांस आमच्या या क्षुल्लक अड-चणींतून पार पाडण्यास, त्याला कितीसा वेळ लागणार आहे? त्याच्या कृपेनें आपले मनोरथ पूर्ण होणार." असें माझी मनो-देवता मला नेहमीं सांगत असे; व तिकडच्या जवळ मी तसें नेहमीं बोलूनही दाखवीत असें.

हाच आत्मविश्वास माझ्या मनास स्थैर्य देऊं लागला. जीं स्थळें मीं पूर्वी कधीं पाहिलींही नव्हतीं, तीं अशीं अशीं असावीं, त्यांची रचना अमुक अमुक प्रकारची असावी, तेथील घरें, दुकानें, बाजार, देवळें, घाट, तीर्थें, लोकांची राहणी व तिक-डील प्रेक्षणीय स्थळें वगैरे अमुक तऱ्हेचीं असावींत असे निर-निराळे बाबींचे सुंदर चित्रपट, माझ्या डोळ्यांपुढें—इकडील पाहि-लेल्या त्या त्या वस्तूंशीं, तिकडील ऐकलेल्या माहितीवरून साम्य व भेद दाखवून—जागृत व स्वप्नसृष्टींत अहर्निश फिरूं लागले.

ईश्वराच्या ठिकाणीं इतकी एकतानता व तल्लीनता झाल्यावर तो आमचे मनोरथ सफल केल्यावांचून कसा राहणार ! त्याच्या कृपेनें आमचा काशीयात्रेच्या प्रवासाचा बेत हळू हळू नक्की होऊं लागला, व तो त्याच्याच इच्छेनें कसा शेवटास गेला, ही हकीकत मोठी मनोरंजक असून तीच पुढील प्रकरणांत वर्णिलेली आहे.



## प्रकरण २ रें.

# निश्चय.

अशा प्रकारें आमचा बेत होऊं लागला. हळू हळू आमच्या खर्चापुरती पैशांची अडचणही नाहींशी झाली. आमच्या उभयतांच्या प्रकृतीसही आराम भासूं लागला. तेव्हां एके दिवशीं काशीयात्रेचा बेत नक्की करण्याविषयीं मीं तिकडच्या-जवळ आग्रह धरिला. त्यावेळीं ' हो, ना ' करितांना अखेरीस असें ठरलें कीं, "काशियात्रा करून परत आल्यावर त्या यात्रे-संबंधाची सविस्तर माहिती मीं प्रवासवृत्ताच्या रूपानें लिहून काढावी." मीही तिकडील या म्हणण्यास रुकार दिला.

आतां काशीयात्रेची तयारी करावयाची, असें ठरवून मी त्या संबंधानें काय काय तजविजी करणें जरूरीचें आहे, याचा विचार करूं लागलें. फराळास कोणते जिन्नस किती घ्यावयाचे, भांडींकुंडीं, वस्त्रपात्र, डागडागिना वगैरे काय काय जिनसा व त्या किती किती घ्यावयाच्या, हाच माझा विचार किती तरी

दिवस चालला होता. मला अशी नेहमीं विचारांत पाहून तिकडून माझी कधीं कधीं थट्टाही होत असे. तिकडचें म्हणणें:— "कांहींएक बरोबर घ्यावयास नको. एक पैसा विपुल असला कीं अष्टसिद्धि हात जोडून आपल्यापुढें उभ्या राहतील." यावर मी म्हणें कीं, "अशा म्हणण्यानें कसें भागणार, बरें! असा पैसा तरी पाण्यासारखा ओतण्यास आपल्याजवळ कोठें आहे? जेमतेम कशीतरी यात्रा करून येण्यापुरती बेगमी! ती अशा रीतीनें खर्च केल्यास तेथील धर्मकृत्यें व इतर खर्च कसे पार पडणार?" अशा प्रकारें बोलणींचालणीं होऊन आमचा जाण्याचा बेत मुक्रर ठरला. त्याचवेळीं केसरी पत्रांतील "यात्रेस निघण्यापूर्वी तार करा." अशी प्रयागचे तीर्थोपाध्ये श्री. भागवत यांची जाहिरात दृष्टीस पडली. ती जाहिरात वाचून त्यांना "तिकडे काय काय धर्मकृत्यें करावीं लागतात व त्यांस साधारणपणें काय खर्च येतो? तें कळवावें." म्हणून पत्र लिहिलें. त्यांचें उत्तर समाधानकारक आल्यानें आमच्या निश्चयांत भर पडली. या गृहस्थांनीं आपल्या पत्रांत तिकडील पंडे वगैरे लोकांपासून कसा त्रास होतो आणि तो कसा टाळावा, याजबद्दल कांहीं सूचना करून त्या संबंधाचीं कांहीं छापील हस्तपत्रकेंही पाठविलीं होतीं.

लवकरच आमचा बेत शेजाऱ्यापाजाऱ्यांस व इष्टमित्रांस आम्हीं कळवूं लागलों. जो तो आपापल्यापरीनें परमुलुखांत सावधगिरीनें वागण्यास सूचना देऊं लागला. माझ्या पूज्य

मातुश्रींच्या ओळखीची कल्याण येथील कांहीं मंडळी दसऱ्याच्या सुमारास काशीयात्रेकरितां गेलेली याचवेळीं परत आली होती. त्यांनीं तर "तिकडे हिन्दू-मुसलमानांचे दंगे होत आहेत; उन्हाळा फार आहे; प्रयाग येथें गंगेचें पाणी फार खोल गेलें आहे; करितां तुम्हीं आपला जाण्याचा बेत सालमजकुरीं न करितां तो पुढील सालीं करावा !" असा आम्हांस निरोप पाठविला.


या भीतिजनक बातमीनें आमचा बेत ह्या वेळेपुरता तरी रहित झाला. तरीपण वस्तुस्थिति काय आहे, ती कळल्यास पहावी, या हेतूनें पुन्हां श्रीयुत भागवत यांस, " वरील हकीकत खरी आहे कीं काय ? तें कळवावें. " म्हणून पत्र लिहिलें. त्यांचें ह्या संबंधाचें आलेलें उत्तर वाचून आमची भीति बरीच दूर झाली. पुन्हां आम्हीं आमच्या जाण्याचा दिवस ठरविला.

आमची उभयतांची नोकरी मराठी शाळेंतील शिक्षकांची; आम्हांस दिपवाळीची सुट्टी पंधरा दिवसांची; तेवढ्या मुदतींत इतक्या लांबचा प्रवास करावयाचा; व ज्यापेक्षां इतक्या लांबच्या पल्ल्यावर आपण कधीं काळीं जाणार, त्यापेक्षां साधल्यास तिकडील आणखींही कांहीं ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळें पाहून यावीं, अशा उद्देशानें सुट्टीला जोडून आणखी सहा दिवसांची किरकोळ रजा मिळावी, या मजकुराचे अर्ज आम्हीं आमच्या वरिष्ठांकडे केले. त्यावेळीं बरीच-वाटाघाट

होऊन ही रजा मंजूर झाली. पण हा मंजुरीचा हुकूम आम्ही जाण्याच्या अगोदर आम्हांस न पोंहोंचल्यामुळें, आम्हांस तिचा उपयोग झाला नाहीं.

वाटेनें जातांना चोऱ्या फार होतात; त्यांतून आम्ही गाडीच्या तिसऱ्या वर्गांतून प्रवास करणारीं माणसें, त्यांत सोबत कोणाचीही नाहीं; अशा स्थितींत कांहीं दगाफटका न व्हावा, म्हणून आम्हीं मुंबई येथील इम्पीरियल बँकेच्या अलाहाबाद व बनारस या दोन्ही ठिकाणच्या शाखांवर पावणेदोनशें रुपयांची एकेक, अशा दोन दर्शनी हुंड्या घेतल्या होत्या. या हुंड्या पटविण्यास फक्त एक रुपाया खर्च आला. आणि ही व्यवस्था आम्हांस पुढील प्रवासांत निर्धास्त राहाण्यास फार उपयोगीं पडली. यांना इंग्रजींत ' ड्राफ्ट ' म्हणतात.

आम्ही उभयतां व आमची एक मोलकरीण भिकूबाई नांवाची मराठे जातीची बाई, अशा तिघांनीं निघण्याचा दिवस निश्चित ठरवून, आम्ही आमच्या आप्तेष्टांचे निरोप घेण्यास व त्यांस आमचा यात्रेस जाण्याचा बेत निश्चित झाल्याचें कळविण्यास लागलें. मीं फराळाचें साहित्यही वाटचालीपुरतें तयार केलें.





## प्रकरण २ रें.

# प्रयाण.

ता. २३ ऑक्टोबर १९२७ रोजीं रात्रीं ९--३० च्या पेशावर एक्स्प्रेसनें जाण्याकरितां आम्ही कुर्ले येथून रात्रीं साडेसातच्या सुमारास मुंबईस जाण्याकरितां निघालों. त्यावेळीं आम्हांस पोंहोंचविण्यास आमच्या चाळींतील श्री. खेडकर नांवाचे सद्गृहस्थ व श्री. मुंडले नांवाचे उपशिक्षक असे उभयतां आमच्या समवेत बोरीबंदरपर्यंत आले. यांनीं आम्हांस चांगली जागा पाहून गाडींत बसवून दिलें. आम्हीं मुंबई ते थेट गयेपर्यंतचीं तिकिटें काढलीं होतीं. थर्ड क्लास एक्स्प्रेस किंवा पॅसेंजरचें हें तिकीट सतरा रुपये दहा आण्यांस मिळालें. हीं अशीं थेटचीं तिकिटें काढण्याचें कारण, तिकडून यात्रा करून आलेल्या लोकांच्या तोंडून आह्मांस असें कळलें कीं, " ईस्ट इंडियन रेल्वेवर थर्ड क्लासचीं तिकिटें वेळेवर मिळत नाहींत. यात्रेकरूंस

कधीं कधीं एकेक दिवस खोटी व्हावें लागतें. पोलिस वगैरेंच्या मदतीनें हीं तिकिटें काढावीं लागतात. या कामीं त्यांना कमी-जास्त पैसेही द्यावे लागतात." अशा प्रकारच्या त्रासदायक हकीकती ऐकून आलीं हीं थेटचीं तिकिटें काढलीं होतीं.

अलाहाबाद येथें आह्मांस प्रथम उतरावयाचें होतें. मुंबई-पासून अलाहाबाद हें ठिकाण ८४५ मैलांवर आहे. त्यामुळें या तिकिटांवर तेथें व काशी येथें जरूर तितके दिवस थांबतां येत होतें. याला इंग्रजींत 'ब्रेक जर्नी' असें ह्मणतात. तरीपण हीं तिकिटें पुढील प्रवासांत आह्मांस चांगलीं उपयोगीं पडलीं नाहींत. याचें कारण येथून निघतांना तिकडील रेलवेच्या रस्त्यांची आह्मांस माहिती नव्हती.

प्रयाग येथून काशीस जातांना "छोटी लाइन" नांवाचा निराळ्याच रेलवेचा फांटा निघतो. आमचीं तिकिटें या लायनीवर चालणारीं नव्हतीं. तीं "बड्या लायनीनें" चालणारीं होतीं. या बड्या लायनीनें काशीस जाण्यास सुमारें १२ तास लागतात, आणि छोट्या लायनीनें ३ तास लागतात. असें प्रयाग येथें गेल्यावर आह्मांस समजलें. बड्या लायनीवर अलाहाबादवरून काशीस जातांना "नैनी" हें जंक्शन स्टेशन लागतें. ह्मणून आमचीं तिकिटें 'व्हाया नैनी' या छापाचीं होतीं.

मुंबईस पेशावर एक्स्प्रेसमध्यें आम्ही बसल्यावर गाडी सुटण्या-पूर्वी सुमारें दहा मिनिटें अगोदर, आह्मांस निरोप देण्या-करितां कुर्ले येथील सद्गृहस्थ श्री. बाबूराव डोंगरे हे येऊन

भेटले. ह्यांनीं आह्मांस एक दिवस अगोदर, घरीं मेजवानीस बोलावून निरोप दिलाच होता. तरीही कांहीं कारण नसतां त्यांनीं आपली शालीनता यावेळींही प्रकट करून, गाडींत बसल्यावर निघण्यापूर्वीं मुद्दाम भेटीस येऊन, तिकडील गळा पुष्पहारमंडित करून व हातीं पुष्पगुच्छ देऊन " पन्थानः शुभाः सन्तु । " असा सत्कारपूर्वक निरोप दिला.

योग्य वेळीं गाडीची घंटा व शीट होऊन " फों, फों, व भक्, भक्, " असा कर्कश व भेसूर आवाज करीत आमचा बाष्परथ मार्गे क्रमूं लागला.

बोरीबंदर स्टेशनांतून अशी लांबची गाडी निघतांना त्या वेळची मौज मोठी पाहण्यासारखी असते. आपल्या दूरदूरच्या नातलगांस व ओळखीच्या पाहुण्यांस पोंचविण्याकरितां आलेली मंडळी आरडून ओरडून व हातवारे करून, त्यांना सांभाळून जाण्यास सांगत असतात; गाडीचा आवाज व त्यांचा गलबला यांचा एकच गोंधळ होऊन जातो; गाडींत बसलेले लोकही आपला कंठशोष करून त्यांच्या निरोपास उत्तरें देत असतात; पारशी, युरोपियन, ख्रिश्चन वगैरे लोक गाडी सुटल्यावर आपापले हातरुमाल वर हवेंत उंच उंच उडवून हालवीत सुटतात; दृष्टिपथाच्या कक्षेंतून गाडी पलीकडे जाईपर्यंत हा प्रकार चालू असतो. हें दृश्य पाहण्यासारखें असतें.

ही गाडी फार लांब जाणारी. त्यामुळ या गाडींतील उतारूही फार लांबलांबचेच असतात. याच कारणानें या गाडींत

बसण्याकरितां, मुंबई नजीकच्या लोकांस बोरीबंदर स्टेशनच गांठावें लागतें. या गाडींतील प्रवासी बहुतेक भय्ये, मुसलमान व पठाण या कडव्या जातींचे असतात. मुंबईस बसतांना प्रत्येक इसम आपणांस निजण्यापुरती चांगली पथारी पसरून, तेवढी जागा आपली म्हणून जणूंकाय मालकीच सांगत सुटतो. त्या जागेवर तो दुसऱ्या कोणास बसूं देत नाहीं. कोणी त्यास त्रास देऊन बसूं लागल्यास तो लगेच हमरीतुमरीवर येऊन दंगामस्तीही करितो. रेल्वेचे अधिकारी तिकडे मुळींच पाहात नाहींत. उलट एखाद्या सात्विक माणसानें कायदेशीर तक्रार केल्यास त्याची दाद लागत नाहीं. रेल्वेचे अधिकारी बेगुमानपणानें निघून जातात आणि ' बळी तो कान पिळी ' हाच न्याय शिरसावंद्य मानावयास भाग पाडतात. अखेरीस गाडी सुटेल, या भीतीनें हे कायद्याचीं कलमें पाठ केलेले गृहस्थ कोठेंतरी एखाद्या कोपऱ्यांत मिळेल तेवढ्या जागेंत संतोष मानून, हिरमुसले होऊन बसतात !


आमच्या गाडीचें थांबण्याचें पहिलें स्टेशन भायखळा असून दुसरें दादर व तिसरें कल्याण होतें. या तिन्ही ठिकाणीं गाडींत बसणाऱ्यांची अतिशय गर्दी झाली. बांकांवर बसण्यास जागा नव्हतीच. तेव्हां कित्येक लोक दोन्ही बांकांच्या मधील खालच्या जागेंत बसले. कोणी दरवाज्यांतून जाण्यायेण्याच्या वाटेवर बसले. आणि कोणी कोणी तर शौचकूपाच्या तोंडावरही बसले !

कल्याण स्टेशनावर माझी पूज्य मातुश्री, माझे प्रिय बंधु चि. दत्तोपंत व आमचे नेहमींचे परिचित सद्गृहस्थ श्री.

विष्णुपंत हे आम्हांस भेटण्यास व निरोप देण्यास आले होते. तेवढ्या चिकार गर्दीत त्यांनीं आमची भेट घेऊन आम्हांस प्रेमपुरःसर निरोप दिला.

ही सर्व मंडळी काशीयात्रा करून आलेली असल्यामुळें, त्यांनीं आम्हांस त्यांच्या ओळखीच्या ठिकाणचीं पत्रें देऊन जरूर पडल्यास त्या त्या ठिकाणच्या त्या त्या इसमांस भेटून मदत घेण्यास सांगितलें होतें.





## प्रकरण ४ थें.

# मार्गक्रमण.

कल्याण स्टेशन सोडल्यावर गाडींत विशेष गर्दी झाली नाहीं. कासारा, इगतपुरी व नाशीक येथें क्वचित् दोनचार प्रवासी चढत व उतरत होते. पुढें मनमाड व भुसावळ येथें मात्र कित्येक प्रवासी चढले व कित्येक उतरले. मनमाड येथून एक फांटा दौंडकडे व दुसरा निजाम हैदराबादेकडे जातो. त्याचप्रमाणें भुसावळ येथून नागपुरावरून कलकत्त्याकडे जाणारा एक फांटा असून दुसरा इटारसीकडे जाऊन झांशीवरून लखनौकडे जातो; आणि तिसरा अंमळनेरास जातो. अंमळनेर येथें बी. बी. सी. आय्. रेलवेचा सुरत येथून निघणारा ताप्ती–व्हॅली रेलवेचा फांटा येऊन मिळतो. मनमाड व भुसावळ ही जी. आय्. पी. रेलवेचीं मोठीं व भव्य स्टेशनें असून, या स्टेशनांजवळ रेलवेचे मोठे कारखाने पाहण्यासारखे आहेत.

भुसावळ येथें आमची गाडी उजाडतांच पोहोंचली. तेथें प्रवासी लोकांस प्रातर्विधि उरकून चहा घेऊन व फराळ करून ताजेतवाने होतां येतें. मुंबईकडील अट्टल चहाभक्तांस हिंदूंच्य हातचा चहा मिळण्याचें—तलफ भागविण्यासारखा चहा मिळ-ण्याचें—भुसावळ हेंच शेवटचें स्टेशन होय. यापुढें केवळ इटारसीसारख्या मोठ्या स्टेशनांवर केळीं, खजूर, चिवडा, चणे, डाळ, मिठाई, जिलब्या व दूध हे पदार्थ नेहमीं मिळतात. विशेषेंकरून, दूध, मिठाई व जिलबी हे पदार्थ प्रत्येक स्टेशनावर आढळतात.

भुसावळपर्यंत मराठी भाषा चालते. पुढें मात्र अस्सल हिंदु-स्तानी भाषा सुरू होते. ज्याला थोडें तरी हिंदुस्तानी येत असेल तोच ह्या लोकांत व ह्या मुलखांत आपली कांहींतरी करमणूक करून घेईल, नाहींतर इतरांच्या तोंडाकडे बावळटासारखें पाहात बसावें लागतें.

दुसऱ्या दिवशीं म्हणजे तारीख २४ ऑक्टोबर १९२७ रोजीं दुपारीं साडेबारा वाजतां आम्ही इटारसी स्टेशनावर पोंहों-चलों. मुंबईपासून इटारसी ४३४ मैलांवर आहे. बरोबर १५ तास एक्स्प्रेसनें येथें येण्यास लागले. येथून अलाहाबादेकडे जाण्यास दोन मार्ग आहेत. एक इटारसीवरूनच झांशीच्या मार्गावरील बिना स्टेशनावर उतरून तेथून कटनीकडे जाणाऱ्या मार्गानें अलाहाबादेस जातो व दुसरा इटारसी येथें उतरून तेथून परस्परच अलाहाबादेस जातो. मुंबईहून निघणारी कलकत्तामेल पहिल्याच मार्गानें जाते. अलाहाबादेकडे जाणाऱ्या प्रवाशास दोन्ही मार्गांनीं जातां येतें. मात्र तिकिटें तशीं काढावीं लागतात.

इटारसी हें ठिकाण मध्यप्रांतांत मोडतें. येथें आह्मी उतरतांच बाजूच्या प्लॅट्फॉर्मवर अलाहाबादेस जाण्याकरितां गाडी उभी होती. स्टेशनावरील हमालानें आम्हांस त्या गाडींत नेऊन बसविलें. स्टेशनावरील हमालास या बाजूस सर्वत्र ' कुली ' म्हणण्याचा परिपाठ आहे. सोईकरितां यापुढें या गोष्टींत हमालास उद्देशून ' कुली ' हाच शब्द मींही कांहीं स्थळीं वापरला आहे.

या गाडींत गर्दी नव्हती. बरोबर दुपारीं १ वाजतां ही गाडी इटारसीहून सुटली. प्रत्येक स्टेशनावर सावकाशपणें विसांवा घेत घेत "शनैः पंथा, शनैः कन्था" करीत ही गाडी आपला मार्ग आक्रमण करीत होती. आतांपर्यंत वाटेनें दिसणाऱ्या सृष्टिसौंदर्याची आम्हांस फारशी मजा वाटली नाहीं. पण या गाडींतून दृष्टिपथाच्या आटोक्यांत येणारा मध्यप्रांताच्या सरहद्दीवरचा प्रदेश, विशेषेंकरून उत्तरेकडे असणाऱ्या विंध्य पर्वताच्या उतरणीवरील हा प्रदेश, त्याच्या उत्तरेकडूनच नर्मदा नदी वहात असल्यामुळें फारच मनोरम, सुपीक व बहारीचा दिसत होता. क्वचित् दिसणारीं खेडीं—पाडीं जरी आपलें दारिद्र्य लपविण्यास असमर्थ होतीं, तरी त्यांतील काळींभोर माणसें व गुरें--ढोरें सशक्त व तेजःपुंज दिसत होतीं. कांहीं शेतांतून नांगरवट चालली होती, तर कांहींतून गव्हांचें रोपटें नुकतेंच डोकें वर काढीत होतें. कित्येक ठिकाणीं ज्वारीस कणसें लागत होतीं, तर कित्येक जागीं कपाशी, तीळ, एरंडी वगैरे गळिताचीं पिकें आपलें अस्तित्व दाखवीत होतीं. अशा या सुपीक प्रदेशांतून

आमचा प्रवास डोळे भरून चालला होता. रात्रीं आठाच्या सुमारास आमच्या गाडीनें नर्मदाब्रिज हें स्टेशन गांठलें. या स्टेशनच्या लगतच असलेला नर्मदेचा पूल बरेच दिवस कोसळून गेलेला आहे. रेलवे कंपनी तो पुन्हां बांधण्याची विशेषशी परवा करीत नाहीं. कारण या बाजूनें जाणारे प्रवासी बहुधा पॅसेंजरच्या थर्डक्लासचे गरीब प्रवासी असतात. आणि गरीब प्रवाशांची काळजी घेण्याचें कारण नाहीं, हा सिद्धांत रेलवेकंपनीनें गृहित धरल्याचीं शेंकडोंशें उदाहरणें आजपर्यंत घडलेलीं आहेत.

असो. हा दिवस दिपवाळीचा असून त्या दिवशीं नरकचतुर्दशी होती. या दिवशीं पुरुषांचें अभ्यंगस्नान अगदीं सुप्रभात व्हावयाचें असतें. त्यावेळीं आम्हीं गाडींत चाळीसगांवच्या पुढें आलों होतों. अर्थात् तेथें कशाचें अभ्यंग आणि कशाचें स्नान ! ईश्वर नामाचा गजर हेंच त्यावेळचें तिकडील अभ्यंगस्नान होतें. तरीपण नर्मदेचें विस्तीर्ण पात्र उल्लंघन करून पलीकडील तीरास जावें लागतें. त्यावेळीं त्या पवित्र नदीच्या पाण्याचा संबंध पाय भिजण्यापुरता तरी येतोच.

या नर्मदाब्रिज स्टेशनावर आलेल्या गाडींतील पुढें जाणारे सर्व प्रवासी उतरतात. ही गाडी पुढें जात नाहीं. पुढें जाण्यास नर्मदेच्या पलीकडील तीरावर अलाहाबादेकडून आलेली दुसरी गाडी उभी असते. या दुसऱ्या गाडीनें आलेले प्रवासी पहिल्या गाडींत बसून इटारसीकडे येतात. या दोन्ही ठिकाणीं प्रवाशांचें सर्व सामान फुकट वाहून नेण्यास रेलवेचे कुली असतात असें सांगतात. पण आम्हांस व आमच्या बरोबरीच्या दुसऱ्या प्रवा-

शांस हा अनुभव आला नाहीं. आम्ही व इतर प्रवासी बराच वेळ "कुली, कुली," करून ओरडत होतों, तरी एकही कुली नाहीं, असें पाहून आमचें सामान आम्हींच घेतलें. रेल्वेकंपनीचा अत्यंत बेपरवाईपणा येथेंही दिसून आला. अंधेरी रात्र, रस्ता लहान, चिंचोळा, खांचाखळग्यांचा व उताराचा असा होता ! जरा आजूबाजूस झाल्यास पाय घसरून खालीं पडण्याची भीति ! पण अशाही बिकट मार्गांत निदान भरपूर उजेडही नसावा, हें किती आश्चर्य ! "नाहीं" म्हणावयास नको, म्हणूनच कीं काय या अर्ध्या मैलाच्या टापूंत धुरानें काळवंडलेले सुमारें पांच सहा कंदील रस्त्याची खूण दाखवीत होते.

अशा या नागमोडी व बिकट वाटेनें, गर्दींतून आम्ही नर्मदेच्या कांठीं येऊन पोंहोंचलों. पलीकडून आलेल्या गाडींतील प्रवाशांनीं भरलेल्या होडया खालीं होत होत्या. तेवढ्या वेळांत आम्हीं नर्मदेच्या कांठावरील पात्रांत शिरून तिच्या पवित्र पाण्यानें हातपाय धुवून मुखप्रक्षालन केलें. तिकडेही मार्जन करून नरक चतुर्दशीचें अभ्यंगस्नान उरकलें. लवकरच आम्हीं एका होडींत बसून सुमारें पंधरा मिनिटांनीं पलीकडील तीरावर उतरलों. त्या पवित्र नदीस लीनतेनें वंदन करून, आम्ही तसाच नागमोडी पण चढणीचा रस्ता चढूं लागलों. दहा बारा मिनिटें चालल्यावर, आम्हांस अलाहाबादेकडे जाणारी दुसरी गाडी दिसली. तिच्यांत आम्हीं आपलें सामानसुमान ठेवून स्वस्थचित्त होऊन थोडा फराळ केला. या गाडींतही गर्दी नव्हती. रात्रीं दहा वाजतां ही गाडी पुढील मार्ग क्रमूं लागली.




## प्रकरण ५ वें.

# उत्तर हिंदुस्तान.

नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील भागास 'दख्खन' किंवा 'दक्षिण हिंदुस्तान' आणि उत्तरेकडील भागास 'उत्तर' किंवा 'उत्तर हिंदुस्तान' असें म्हणतात. दक्षिणेकडील भागांत शालिवाहन शक चालतो. उत्तरेकडील भागांत विक्रम संवत् चालतो. हल्लीं ब्रिटिश अमदानींत या शकांची किंवा संवतांची आपणांस जरूर लागत नाहीं. कारण सर्व भूतलावर हल्लीं ब्रिटिश सनच प्रचलित आहे. तरीपण तो

विक्रमसंवताच्या नंतरचा आहे, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हल्लीं विक्रमसंवत् १९८४ असून इसवी सन १९२८ आहे, व शालिवाहन शक १८४९ आहे. यावरून विक्रमसंवत् हा इसवी सनाच्या ५६ वर्षें अगोदरचा असून शालिवाहन शक ७९ वर्षें नंतरचा आहे. तसेंच विक्रम व शालिवाहन या दोन शकांत १३५ वर्षांचें अंतर आहे. विक्रमसंवत् कार्तिक शुद्ध प्रतिपदेस, शालिवाहन शक चैत्र शुद्ध प्रतिपदेस आणि इसवी किंवा ख्रिस्ती सन जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस या प्रमाणें दर वर्षास नवीन सुरू होतात, या गोष्टी सर्वश्रुत आहेत.

या उत्तर हिंदुस्तानांत प्राचीन कालापासून मोंगल साम्राज्याच्या अखेरपर्यंत, आपणांस सार्वभौम, चक्रवर्ति व शककर्ते म्हणविणारे अनेक राजे, महाराजे व बादशाह होऊन गेले. अद्यापहि कांहीं अवशिष्ट घराणीं या प्रांतांत लहान लहान संस्थानिकांच्या रूपानें, ब्रिटिश सरकारचीं मांडलिक म्हणून नांदत आहेत. त्यांपैकीं इंदूर, भोपाळ, ग्वाल्हेर, अलवार, वगैरे प्रसिद्ध आहेत. यांच्याहून लहानसहान संस्थानें पुष्कळच आहेत.

इकडील बहुतेक गांवांस मुसलमानी नांवें दिलेलीं आढळतात. याचें कारण बहुधा मोंगल साम्राज्य असून तत्कालिन राज्यकर्त्यांनीं हीं गांवें वसविलेलीं असावीं, असें वाटतें. हा प्रदेश धनधान्य संपन्न म्हणून पूर्वापार प्रसिद्ध आहे, हल्लीं जरी

ती संपन्नता नष्ट झालेली आहे व जिकडे तिकडे लोक कंगाल, बेकार व निरुत्साही दिसतात, तरी हा प्रांत एकंदरींत फार सुपीक असून मुंबईकडील राहाणीच्या मानानें इकडील राहाणी बरीच स्वस्ताईची भासते.

ब्रिटिश राज्यांत जरी सर्व प्रकारची सुधारणा विद्युद्वेगानें सर्वत्र होत आहे, तरी हा प्रदेश चहापानापासून मुंबईच्या मानानें अद्याप पांचशें वर्षें मागें आहे. जबलपूरसारख्या मोठ्या स्टेशनावर आम्हांस हिंदूच्या हातचा चहा मातीच्या कपांतून मिळाला. ते चहा विकणारे लोक हे कप परत घेत नाहींत. आम्हांस ही नवीन वस्तु प्रथमच दृष्टीस पडल्यामुळें आश्चर्य वाटलें! त्यामुळें ते कप आम्हीं टाकून न देतां जवळ ठेविले. पण पुढें प्रत्येक मोठ्या स्टेशनावर आम्हांस हेच कप दिसूं लागले, त्यामुळें आमच्या जवळच्या कपांचें नाविन्य जाऊन ते आम्हीं फेकून दिले. या कपांत चहा मातट लागतो. पण 'स्ट्रॉंग्—टी' किंवा 'चहाची टेस्ट' वगैरे शब्द तिकडील लोकांस माहीत नसल्यामुळें, कांहींतरी एक पेय, म्हणून हा चहा विकला जातो. या प्रांतांतील लोकांस चहाचें व्यसन नाहीं. त्यामुळें त्यांचीं शरीरें कणखर, दमदार व सतेज दिसतात. तरी पण तत्प्रांतीय लोक या बाजूस मुंबई पुण्याकडे येतात, त्यावेळीं त्यांना या मुंबईकडील ऐहिक अमृताचा स्वाद आदरातिथ्याच्या व पाहुणचाराच्या योगानें मिळतो. ते परत गेल्यावर गंगौघाप्रमाणें हा चहाचा प्रवाह आपल्या घरींदारीं सुरू

करितात. त्यामुळें लवकरच इकडील धष्टपुष्ट माणसें आपल्या-सारखींच कागदी पहेलवान झालेलीं आपणांस पाहाण्यास मिळतील, असें वाटतें.

या प्रकारें आमचें मार्गक्रमण सुरू असतां, जबलपूर स्टेश-नापासून आमच्या व प्रयागच्या पंड्यांच्या गांठी पडूं लागल्या. या पंड्यांचे दलाल व नोकर बहुतेक लहान मोठ्या स्टेशनांवर आढळतात. त्यांनीं आम्हांस-" तुम्ही कोण ? कोठून आलां ? तुमचें नांव काय ? गांत्र कोणतें ? कोंकणांतील मूळ गांव कोणतें ? " वगैरे नाना तऱ्हेचे प्रश्न विचारले. जों जों अलाहाबाद स्टेशन जवळ येऊं लागलें, तों तों हा पंड्यांचा सुळसुळाट जास्तच होऊं लागला.

गाडी सुरू होतांच हे गाडींतही बसत. स्टेशनावरील पोलीस, तिकिटकलेक्टर व पोर्टर हे लोकही त्यांना सामील असून यात्रेकरूंस त्रास देण्यास मदत करितात, अशीही आम्हांस शंका आली.

एका स्टेशनावर तर फक्त लंगोटी लावलेला दिगंबर व जटा-धारी गोसावी, दोघे पोलिस घेऊन आले. त्यांनीं " हे शंकरच आहेत. " असें म्हणत त्यास आमच्याच डब्यांत बसविलें. त्यावेळीं त्या पोलिसांस इकडून विचारिलें कीं, " रेलवेचे पोलिस हे प्रवाशांच्या संरक्षणाकरितां ठेविलेले अस-तात किंवा त्यांस धोक्यांत घालण्याकरितां ठेविलेले असतात ? कारण आमच्याजवळ बायकामाणसें आहेत, तरी या डब्यांत तुम्ही

या साधुमहाराजांस मुद्दाम आणून बसवितां. तुमच्या म्हणण्याप्रमाणें कदाचित् ते शंकरच असतील, मी नाहीं म्हणत नाहीं. पण ते रात्रीच्या वेळीं या डब्यांत न बसतां जर स्मशानांत बसतील, तर मीही त्यांच्यापुढें नाक घांसून व हात जोडून उभा राहीन. पण या डब्यांत ते जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत आम्हांस सुरक्षितता वाटणार नाहीं. एवढ्याकरितां तुमचे नंबर मी टिपून घेतों व जर कांहीं कमजास्त प्रकार घडला तर तुमचे नंबर मी पुढें केल्यावांचून राहाणार नाहीं." असें म्हणून त्यांचे नंबर नोटबुकांत टिपून घेतले. त्यावेळीं ते दोघेही पोलीस गुमींगुमीनें तसेच निघून गेले. पण पुढें त्यांना काय वाटलें कोण जाणे ! थोड्याच वेळांत त्यांपैकीं एक परत आला. त्यानें त्या साधूस उतरवून नेलें.

ही जशी रेलवे पोलिसांची तशीच त्या पंड्यांची व त्यांच्या गुमास्त्यांची कृति होती. प्रवासी थोडासा भोळसर असला कीं हे कावेबाज लोक त्याला आपल्या जाळ्यांत पट्दिशीं धरितात; त्याला हे लोक नानातऱ्हेच्या भूलथापा देतात; निरनिराळीं आमिषें दाखवितात; मोठ्या धूर्तपणानें अगदीं गोड व मिठास भाषणें करितात.

यात्रेकरूकडून "मला प्रयाग येथें यात्रा करावयाची आहे, माझा उपाध्या मला न आढळल्यास मी तुमचेकडून यात्रा करून घेईन" इतकें अभिवचन युक्तिप्रयुक्तीनें काढून घेतात. यावेळीं ते बोलण्यांत इतका सात्विकपणा, नम्रता,

चतुराई, सफाई व प्रसंगावधान दाखवितात कीं, खरोखर त्यांच्या अकलेची तारीफ करावी लागते. यात्रेकरूला ते कोण-त्याही गोष्टीची उणीव भासूं देत नाहींत. “ तुम्ही कांहींही द्या अगर देऊं नका; नुसतें तुळशीपत्र जरी आमच्या हातावर ठेविलेंत, तरी आम्ही तें फार संतोषानें घेऊं; तुमचें सर्व कार्य तुमच्या अगदीं पसंतीप्रमाणें यथाशास्त्र व यथासांग करून देऊं; तुम्हांस वाटखर्चास पैसे नसल्यास तेही आम्ही देऊं; घरीं गेल्यावर आमचे पाठवा !” अशा एक ना दोन, शेंकडों थापा देऊन साधारण मनुष्यास ते सहजीं मोह उत्पन्न करितात. तो त्यांच्या कबजांत आला असें त्यांस वाटतांच, त्याला नैनी स्टेशनावरच —तेथून गाडीच्या पुलाखालून वाहात येणारी यमुना नदी दाख-वून—“प्रयाग तो हाच; येथून त्रिवेणी अगदीं जवळ आहे; अला-हाबादेस जाण्याचें आतां कारण नाहीं; अलाहाबादेस गेल्यास तेथून तीनचार रुपये खर्च करून घोड्याची गाडी करावी लागेल व पुन्हा येथेंच परत यावें लागेल. ”—वगैरे सांगून यात्रेकरूस तेथेंच उतरवितात. आमच्या देखत नैनी स्टेशनावर या गाडींतून ५०।६० माणस तरी उतरलीं. पण प्रत्येक प्रवाशाबरोबर पंड्यांचा एकेक तरी इसम होताच. आम्हांसही “ तुम्ही याच स्टेशनावर उतरा. ” म्हणून त्या पंड्यांचा कोण आग्रह ! पण आम्हांस ही सर्व परिस्थिति अगोदर कळली होती म्हणून आम्ही सावध होतों. त्या सांगण्यास आलेल्या बहुतेक पंड्यांस, कोणास उडवाउडवीचीं तर कोणास

रागीटपणाचीं उत्तरें देऊन आम्ही वाटेस लावीत होतों. तरीही त्यांपैकीं कित्येक आपला लोंचटपणा व कोडगेपणा न सोडतां उलट अधिक लागटपणानें–आमच्या बोलण्याचा राग, लोभ वगैरे विकार मुद्रेवर यत्किंचित्‌ही आल्याचें आम्हांस दिसूं न देतां–पुन्हा पुन्हा आमचीं आर्जवें करीत होते.


अशा रीतीनें येत येत आम्ही अलाहाबाद स्टेशनावर उतरलों त्यावेळीं सकाळचे १० वाजले होते. स्टेशन फार अवाढव्य व प्लॅट्फॉर्म् तर लांबचलांब दिसले. तेथेंही पंडे होतेच. त्यांची पूर्वीं कथन केल्याप्रमाणेंच प्रश्नमालिका, विनंत्या व आर्जवें सुरू झालीं.—"धर्मशाळेंत चला. तेथें तुमची सर्व व्यवस्था लागेल." हें वाक्य येथें जास्त जोरानें उच्चारिलें जात होतें. ही धर्मशाळा म्हणजे या पंडेस्वरूपी ठकांचें माहेरघर आहे. तेथें यात्रेकरूस नागविलें जातें. वगैरे हकीकतीचें वर्णन श्री. भागवत यांचे पत्रीं होतें त्यामुळें येथेंही आम्ही सावध होतोंच.

स्टेशनच्या बाहेर येतों तों गाडीवानांची हीच तऱ्हा ! दोन गाडीवान आपल्या गाड्या घेऊन एकदम पुढें आले. एकानें एक बोजा घेतला तर दुसऱ्यानें दुसरा उचलला. अखेरीस ते आपसांतच शिवीगाळ करून हातघाईवर येऊं लागले. यांतही एका गाडीवानास एक पंड्या इषारा देत होता. जवळ उभे असलेले पोलीस ही सर्व मजा पहात होते. पण तोंड उघडतील तर शपथ ! अखेरीस स्वतः पुढें होऊन पोलिसास सांगणें झालें कीं, " मला या दुसऱ्या इसमाच्या गाडींत बसावयाचें

नाहीं. तुम्ही याचा बंदोबस्त करीत नसल्यास मी तुमच्या वरिष्ठांस तार करितों. " इतकी दमदाटी दिल्यावर, शिपाई-बुवांची दांतखीळ उघडली व त्यांनीं त्या पंड्यांच्या सांकेतिक गाडीवानास दूर केलें.

सारांश, या स्टेशनावर मिळमिळितपणानें राहून भागाव-याचें नाहीं. अलाहाबादपासून दारागंज उर्फ प्रयाग ५ मैल लांब आहे. तेथें जाण्यास दोन घोड्यांच्या गाडीचें भाडें मैलीं नऊ आणे प्रमाणें दोन रुपये तेरा आणे पडतें. पण हें नवख्या व गैरमाहीत इसमास द्यावें लागतें. नाहींतर दीड अगर दोन रुपयांपर्यंतही ही गाडी मिळते. या गाड्यांखेरीज तिकडे ' एक्का ' या नांवाच्या एका घोड्याच्या गाड्या असतात. यांचें भाडें थोडें असतें. प्रसंगीं आठ आणे भाड्यांतही या गाडया मिळतात. पण यांत तीन सडीं माणसें कशीं तरी बसतात. मधल्या इस-माखेरीज दोन्ही बाजूंच्या माणसांनीं त्या गाडीच्या कोन्यांत उभ्या असलेल्या पुढील बाजूच्या काठीस धरून बसावें लागतें. तरीही पडण्याची भीति असतेच. इकडील देवाच्या रथासारखी कांहींशी या गाडयांची रचना असते व वर देवळासारखाच छत्रीच्या आकाराचा लहानसा घुमट असतो. दोन घोडयांच्या गाड्या बगीसारख्या असतात. सर्व सामान गाडीच्या वर ठेव-ण्याची चांगली सोय असते. आंत चार व बाहेर हांकणाराजवळ दोन मिळून सहा माणसें या गाडींत चांगल्या रीतीनें बसतात.

अलाहाबाद स्टेशन सोडल्यावर ‘ चौक ’ नांवाचा शहराचा भाग लागतो. मुंबईंतील कोटासारखी या भागांत थोडीशी रहदारी व दुकानांची मांडणी दिसते. मोठमोठीं सरकारी ऑफिसें, बँका, सुखवस्तु व धनाढ्य लोकांचे बंगले आणि बगीचे याच भागांत आहेत. खुशरूबाग ही पाहण्यासारखी बाग आहे. अलाहाबाद याचा अर्थ अल्लाह म्हणजे देव व आबाद म्हणजे शहर म्हणून “ देवाचें शहर ” असा करितात.





प्रकरण ६ वें.

# जान्हवी भेट.

मुंबई सोडल्यापासून वाटेंत कोठेंही न थांबतां सुमारें ३८ तासांनीं, तारीख २५ ऑक्टोबर १९२७ रोजीं सकाळीं ११॥ वाजतां आम्ही प्रयागास श्री० भागवत यांचे घरीं पोंहोंचलों. थोडा वेळ विश्रांति घेऊन उपाध्येबुवांशीं बोलणें केलें. यांत मुख्य विषय तेथील धर्मकृत्यें व त्यांना लागणारा खर्च यासंबंधीं होता.

हे उपाध्ये आपणांस 'आधुनिक पद्धतीचे' म्हणवीत होते. तरी बोलण्या चालण्यांत, तेथील तीर्थमहिमा व शास्त्र-रूढी सांगण्यांत, द्रव्याभिलाष दाखविण्यांत व तें गोड बोलून

काढण्यांत यांची ठिकठिकाणच्या क्षेत्रस्थ भिक्षुकांच्या अंगीं मुर-लेली पूर्वपरंपरा व काकदृष्टी आम्हांस व्यक्त होत होती.

त्यांनीं येथील तीर्थविधि तीन दिवसांचा सांगितला, **पहिल्या दिवशीं गंगाभेट, पूर्वांग व उत्तरांग प्रायश्चित्त, सचैल व सक्षौर स्नान आणि उपोषण; दुसरे दिवशीं तीर्थश्राद्ध, पिंडांवर गोप्रदान व सुफल; आणि तिसरे दिवशीं सौभाग्यवायन, वेणीदान, सुवासिनी व ब्राह्मणभोजन.**

पहिल्या दिवशींचा सर्व विधि शुद्ध भागीरथीच्या कांठीं होतो. ही भागीरथी म्हणजेच जान्हवी होय. क्षौर व प्रायश्चित्तें हीं पुरुषांनीं करावयाचीं असतात. पण गंगाभेट व उपवास हीं धर्मकृत्यें सर्वांनीं करावीं लागतात. या भागीरथीस बांधीव घांट फारसे नाहींत. पुण्यश्लोक साध्वी अहिल्याबाई यांनीं बांधिलेला घाट भटजींनीं आम्हांस दाखविला. पण नदीचें पाणी कोणत्याच घाटाजवळ नव्हतें याचें कारण या नदीचें पात्र फार विस्तीर्ण आहे. त्यांतील पाणी बारा वर्षेपर्यंत प्रयाग गांवच्या बाजूस चढतें व पुढील बारावर्षेपर्यंत तें पलीकडील तीराकडे जातें, असें सांगतात.

नदीच्या तीरावर एकसारखी वाळू आहे. सूर्यकिरणांनीं ती एकसारखी चकाकत असते, अगदीं पाण्याजवळ गंगापुत्रांनीं फळ्या वगैरे मांडून आपल्या छावण्या केलेल्या असतात. तशाच फळ्यांचे घाट किंवा ताफे नदीच्या पात्रावरही करितात. गंगाभेट होण्यास निदान एक नारळ व दोन आणे तरी या गंगापुत्रांस द्यावे लागतात. हे गंगापुत्र म्हणजे तिकडील पंड्यांचे वंशज असतात.

उपाध्या कोणीही असो, पण गंगाभेटी पुरता तरी हा हक्क या गंगापुत्रांचाच असतो व म्हणूनच ते आपणांस ‘ गंगापुत्र ’ म्हणवितात.

भागीरथीचें पाणी फार स्वच्छ, निर्मळ व शुभ्र आहे. या पाण्यास ओढ विलक्षण असून ठिकठिकाणीं सदोदित भोंवरे उत्पन्न होतात. नवीन मनुष्य गुडघाभर पाण्यांत गेला, तरी त्याला भीति वाटते. काशीयात्रेहून परत येतांना गंगापूजनाकरितां आणावयाची भागीरथी येथीलच आणावयाची असते. पंडे लोक संगमाची किंवा काशीचीही गंगा घ्यावयास सांगतात, पण खरी गंगा म्हणजे प्रयागची शुद्ध भागीरथी होय, असें आमच्या उपाध्यांनीं आम्हांस सांगितलें.

भटजींनीं आम्हांस नदी किनाऱ्यावर नेऊन तेथें तिकडून प्रायश्चित्तें व क्षौर वगैरे विधि करविले. या प्रायश्चित्ताच्या संकल्पांत ते भटजी कोणतीही वाईट गोष्ट शिल्लक ठेवीत नाहींत. सर्व वाईट गोष्टींचा तोंडानें उच्चार करण्यास लावून “या पापांपासून तुझ्या स्नानानें मला मुक्त कर.” अशी गंगामातेची प्रार्थना ते करवितात. क्षौर व स्नान झाल्यावर नेसलेलें ओलें वस्त्र उपाध्यास द्यावें लागतें. याप्रमाणें पहिल्या दिवशीं आम्हीं गंगाभेट घेऊन उपवास केला. उपवासाचे पदार्थ तिकडे चांगले मिळतात.



## प्रकरण ७ वें.

# प्रयागचीं दर्शनें.

॥ त्रिवेणीं माधवं सोमं । भारद्वाजंच वासुकीं ॥
॥ वन्दे अक्षय्यवटं शेषं । प्रयागं तीर्थनायकं ॥

हा प्रातःस्मरणीय श्लोक असून यांत प्रयागांत पाहाण्यासारखीं व पवित्र स्थानें कोणतीं, तें सांगितलेलें आहे. दुसऱ्या दिवशीं आमचें तीर्थश्राद्ध व भोजन वगैरे झाल्यावर आम्ही वरील श्लोकांतील माधव, भारद्वाज व वासुकी यांच्या दर्शनास एका करून गेलों. जातां येतां त्यास सव्वा रुपया भाडें दिलें.

श्लोकांत प्रतिपादित केलेला माधव हें प्रयागांतील मुख्य दैवत होय. याचे देवळांत वेणी आणि माधव अशा दोन मूर्ति आपल्याकडील लक्ष्मी-नारायणाच्या मूर्तीसारख्या सन्निध असतात. आणि या दैवताचें नांवही 'वेणी-माधव' असें सामासिकच आहे. हीं वेणीमाधवाचीं देवळें प्रयागांत ७।८ आहेत, त्यांपैकीं दारागंज गांवांतील मुख्य मानितात. त्याचें दर्शन घेऊन आम्ही वासुकीच्या दर्शनास गेलों. वेणीमाधवाच्या देवळापासून सुमारें पाऊण मैलावर नदी किनाऱ्यावर हें वासु-

कीचें देऊळ आहे. देऊळ मोठें प्रेक्षणीय असून त्यावरील खोदकाम पाहाण्यासारखें आहे. एकजात तांबूस रंगाचा दगड यास सर्वत्र वापरलेला दिसतो. देवळाच्या मुख्य गाभाऱ्यांत पांच फडा उभारलेली शेषाची मूर्ति, खालील भागांत वेटाळें घालून उभी असलेली, सुमारें तीन फूट उंचीची आहे.

दारागंज गांव सोडून सुमारें एक मैल गेल्यावर भारद्वाज ऋषींचें देऊळ आहे. त्याच्याच शेजारीं सीतागुंफा, वाल्मिक-ऋषि, मारुति, देवी, गणपति वगैरे लहान मोठीं बरींच देवळें आहेत. या सर्व देवळांतून दर्शनास जातांना पैशांच्या बाजूनें फारच सावधगिरी ठेवावी लागते. दरवाज्याजवळ फुलें, तुळशी या जिनसा विकत मिळतात. देवास या जिनसा वाहून पुढें पैसा ठेवण्याचा अवकाश, कीं लगेच भिकार पाठीस लागतें. एकाद्यास एकादा पैसा देण्याची खोटी, कीं दुसरे पांच–पंचवीस जमा होतात. ते रस्ता आडवितात; पोटावर मारून घेतात; रडतात; ओरडतात; पाठीस लागतात; अशा नाना तऱ्हा करितात! इतकेंही करून कोणीं कांहींच न दिल्यास, त्यास शिवीगाळ करून त्याच्या आंगावरील कपडे ओढण्यास व फाडण्यास तयार होतात. या करितां या देवांच्या दर्शनास जातांना त्या बाजूचा कोणी चांगला माहीतगार इसम बरोबर घेतल्यावांचून जाऊं नये. आमच्या भटजींनीं आम्हांस दिलेला गाडीवान, चांगला माहीतगार होता. त्यामुळें आम्हांस वरील प्रकारचा त्रास झाला नाहीं. पण इतर दर्शनेच्छूंस होत असलेला आमच्या नजरेस पडत होता.

प्रकरण ८ वें.

# माझें वेणीदान.




प्रयागास क्षौर हा विधि सर्वांस आहे. जिवंत पितृकास कोणत्याही क्षेत्रीं क्षौर नसतें, पण तें या क्षेत्रांत आहे. सुवासिनीस या वेणी-दानाच्या कृत्यानें या विधीचा थोडासा संस्कार होतोच. आणि या विधीनें सुवासिनीस उत्तम गति मिळते, अशी धर्मभावना असल्यामुळें प्रत्येक सुवासिनीची इच्छा हा विधि जरूर घडावा, अशी असते.

आमचा हा प्रयागांतील तिसरा दिवस होता. अगदीं सुप्रभातीं भटजी आम्हांस उठविण्यास आले. प्रातर्विधि उरकतांच भटजींच्या कुटुंबानें मला न्हाऊं घातलें. त्यांच्या मुलीनें तिकडे उटणें वगैरे लाविलें. उभयतांचें उष्णोदकानें स्नान झालें. उभयतांनीं शुभ्र वस्त्रें परिधान केल्यावर भटजींनीं आम्हांस पुण्याहवाचनास वसविलें. त्यावेळीं मला फुलांची मुंडावळ व जाळी बांधिली. तिकडे फक्त मुंडावळच बांधिली.

विधिपूर्वक पुण्याहवाचन झाल्यावर, मीं भटजींच्या कुटुंबास सौभाग्यवायन दिलें. या वायनांत एका सुपलींत लुगडें, चोळी, जोडवीं, विरवल्या, मणीमंगळसूत्र, नाकांतलें सुंकलें, कानांतलीं सुंकलीं व डोक्यांत घालण्यासारखें लहानसें सोन्याचें फूल इतक्या जिनसा घालून, वर दुसरी सुपली आच्छादन ठेवून तें देतात. या वायनानेंही सुवासिनी स्त्रियांचें ऐहिक सार्थक्य होतें, अशी धर्मभावनाच आहे. हें वायन दिल्यावर भटजींच्या कुटुंबानें कुंकवानें माझें मळवट भरलें. त्याच मुंडावळी वगैरे थाटांत आम्ही उभयतां, भटजी व आमची मोलकरीण अशीं घरांतून बाहेर पडलों. वेणीदानाकरितां संगमावर जावें लागतें. आमच्या बिऱ्हाडापासून हें ठिकाण सुमारें मैलभर लांब होतें. तेथें नावा असतात. आमच्या भटजींनीं पूर्वींच नाव ठरविलेली होती. वेणीदानास जातांना एक वाजंत्री बरोबर न्यावयाची पूर्वीं पद्धत होती. तो आपलें ढोलकें “ ढूम, ढूम ” वाजवीत बरोबर येत असे. हल्लीं ही चाल महाराष्ट्रीय स्त्रियांपुरती तरी मोडली आहे.

सम्राट अशोकानें बांधिलेल्या भव्य किल्ल्यापर्यंत आम्ही चालत गेलों. संगमाचे किनाऱ्यावर नावा व नावाडी तयार होते. आमच्या ठरलेल्या नावेंत आम्ही बसल्यावर नावाड्यानें वल्हें मारून नाव पाण्यांत सोडली. भटजींचा मंत्रघोष सुरू झाला. माझ्या न्हालेल्या केसांची वेणी घालण्यास भटजींनीं तिकडे सांगितलें. तिकडे कधींच माहीत नसल्यामुळें केसांचे

पेड करावे कसे व ते धरावे कसे ! ही मोठी पंचाईत पडली. अखेरीस मींच पेड करून दिले. लोंबती वेणी कशीबशी घातली. शेवटच्या अग्रांत एक लहानसें सोन्याचें फूल ओविलें. भटजींनीं कातर मंतरून तिची पूजा करविली. त्या कातरीनें शेवटाकडील सुमारें तीनचार बोटें वेणी, भटजींनीं तिकडे कातरण्यास सांगितली. ती कातरून माझ्या ओंजळीत दिल्यावर, भटजींनीं पुन्हा मंत्र म्हणून तिच्यांत घातलेल्या फुलासुद्धां ती माझेकडून दान घेतली. हा विधि थोडा गंभीर स्वरूपाचा आहे. पण तो झाल्यानें स्त्रियांस धन्यता वाटते, तशी मलाही वाटली.





### प्रकरण ९ वें.

## तीर्थराज प्रयाग.

प्रयाग म्हणजे संगम. असे संगमांचे प्रयाग अनेक आहेत, पण ह्या सर्वांत हाच श्रेष्ठ मानिलेला असून याला ‘ तीर्थराज ’ अशी संज्ञा आहे. **गंगा, यमुना व सरस्वती या तिन्ही पवित्र नद्यांचा संगम या ठिकाणीं होतो.** ज्या मध्य ठिकाणीं हा संगम होतो, तेथेंच वेणीदान करावयाचें असतें. भटजींनीं वेणींतील सोन्याचें फूल काढून घेऊन त्यांनीं वेणीच लहान लहान मोकळे केश आमच्या देखत संगमांत सोडले. पाण्यावर केश तरंगतात, असें भौतिक शास्त्र सांगतें. पण येथें केश पाण्यांत बुडत असल्याचें आम्हीं पाहिलें. रोज येथें किती तरी वेणीदानें होतात. महाराष्ट्रीय स्त्रिया तीनचार बोटें वेणी कातरून तिचेंच वेणीदान करितात, पण मद्रासकडील कांहीं

जातींच्या स्त्रिया आपलें वपनच करून घेतात व डोक्यावर काळें फडकें बांधितात ! खेरीज पुरुषवर्गाचें क्षौर नेहमीं असतें. तरीपण या निर्मळ पाण्यांत कोठें एकही केश अगर गुंतवळ दिसत नाहीं. ही सामक्षा काय असेल ती असो !

संगमाच्या मुख्य भागांत गंगेचें शुभ्र पाणी, यमुनेचें काळें पाणी आणि सरस्वतीचें किंचित् लालसर पाणी. अशा या निरनिराळ्या तीन रंगांच्या पाण्यांचें, एकमेकींच्या जललहरींत संमिश्रण अहोरात्र व अखंड सुरू असतें. तो देखावा मोठा रमणीय, चित्ताकर्षक व आनंददायक भासतो. एकसारखें या संगमाच्या रेषेवर पाहात राहावें, असें वाटतें ! मोठमोठ्या कवींनीं व ऋषींनीं या त्रिवेणी संगमावर फार बहारीचीं कवनें व पुराणें लिहिलेलीं आहेत. कुंभमेळ्याची यात्रा या ठिकाणीं दोन-तीन लाख येते, असें सांगतात. त्याखेरीज नेहमींच्या पर्वकालीं आजूबाजूचीं बरीच यात्रा येथें येते. ग्रहणासारख्या पर्वणीच्या वेळीं तर नदीकांठ फुलून जातो. गंगेची रोजची पूजा व आरती या गोष्टी पाहूनही चित्तास समाधान वाटतें.

वेणीदान केल्यावर आमची नाव पलीकडील तीरास नेली. तेथें त्रिवेणींत सर्वांनीं स्नानें केलीं. इकडील सर्वच लोक यात्रेकरूंस लुबाडण्याकरितां टपलेले असतात. आमच्या नावाड्यानें स्नानें करितांना आम्हांस गंगेत पैसे टाकण्यास सांगितलें. भटजींनीं खूण केल्यामुळें तिकडून पैसे टाकणें झालें नाहीं. पण माझ्या हातावर नावाड्यानें दोन पावल्या देऊन त्या गंगेंत

टाकण्यास सांगितलें. मींही कांहीं विचार न करितां त्या गंगार्पण केल्या. दोन तीन बुडया मारून नावाड्यानें त्या काढिल्या व पुन्हा "आपले पैसे द्या." म्हणून मजजवळ हक्कानें आठ आणे तो मागूं लागला. तरी त्याला या लहानशा प्रवासाचें भाडें दोन रुपये भटजींनीं ठरविलें होतें.

स्नानें केल्यावर तीं वस्त्रें ब्राम्हणास द्यावीं लागतात. बरोबर नेलेलीं दुसरीं कोरडीं वस्त्रें आम्हीं परिधान करून पूर्वी श्लोकांत सांगितलेल्या सोमेश्वराच्या दर्शनास गेलों. ब्रह्मदेवानें येथें दाहा यज्ञ करून सोमेश्वराचें लिंग स्थापिलें. अशी पुराणकथा असून याच्या दर्शनावांचून ही यात्रा सफल होत नाहीं, असें क्षेत्र-महात्म्य आहे. नदी—किनाऱ्यापासून हें देऊळ सुमारें अर्ध्या-मैलावर आहे. देऊळ लहानसेंच दगडी बांधलेलें आहे, जवळ बिल्ववृक्ष आहेत. तेथील पुजारी वगैरे लोकांची वस्ती आसपास थोडीशी आहे. त्याच्या जवळच काळभैरव, मारुति व देवी हीं देवळें असून पलीकडे अहोरात्र धुमसत असलेलें अग्निकुंड आहे.

हीं सर्व दर्शनें घेऊन आम्ही परत येऊन नावेंत बसलों. त्याच बाजूच्या तीरास असलेल्या वेणीमाधवाच्या देवळाकडे नाव वल्हविली. येथें वाटेंत यात्रेकरूंवर कर आहे. हा कर माणशीं दीड पैसा म्हणजे साडेचार पै आहे. हा कर भरून टेकडीवर असलेल्या वेणीमाधवाचें दर्शन घेऊन, पुन्हा नावेंत बसून आम्ही किल्ल्याकडील तीरास आलों. किल्ल्याच्या खालच्या बाजूस सरस्वती कुंड आहे. तेथून सरस्वती नदी निघते

व ती गंगा आणि यमुना यांच्या खालून वाहते. त्यामुळें संगमाचे ठिकाणीं पाणी उचललेलें दिसतें. नावेंतून उतरल्यावर आम्ही किल्ल्यांत गेलों. हा किल्ला अद्याप चांगल्या स्थितींत आहे. तेथें इंग्रजांचें थोडें लष्कर आहे. त्यामुळें सर्व किल्ला पाहण्यास परवानगी मिळत नाहीं. पण या किल्ल्यांत एक भुयार असून त्यांत पूर्वी श्लोकांत वर्णिलेला अक्षय्यवट आहे. त्याच्या व त्या ठिकाणीं असलेल्या इतर देवतांच्या दर्शनाकरितां यात्रेकरूंस मज्जाव नाहीं. उलट तळघरांतील अंधारांत दिवा घेऊन प्रत्येक देव दाखविण्यास एक मनुष्य ठेविलेला असतो. या भुयारांत वाल्मिक, श्यामकीर्ति, नरसिंह, प्रयागराज, गोरखनाथ, अग्निदेव, सत्यनारायण, शेष, दत्तात्रय, शंतनू, कुबेर, वेणीमाधव, धर्मराज, मार्कंडेय, गंगा, यमुना, व भैरवनाथ इतक्या वंदनीय मूर्ति आहेत. यांचा चित्रपट एक पैशास किल्ल्याच्या दरवाजावर मिळतो.

या अक्षय्यवटाचें मूळ या किल्ल्यांत, खोड काशींत आणि शेंडा गयेंत पूज्य मानला जातो. मारुतिरायांनीं आपल्या हातांनीं हा वृक्ष येथून मोडून त्याचे वरील तिन्ही भाग या वरील तिन्ही ठिकाणीं स्थापन केले व पुन्हां प्रयागास परत येऊन विश्रांति घेण्याकरितां ते निद्रिस्त झाले, असें सांगतात. किल्ल्यांतून परत येतांना या विशालदेही निद्रिस्त मारुतीचें आम्हीं दर्शन घेतलें व घरीं आलों.

भोजन उरकल्यावर बँकेंत जाऊन अलाहाबादची पहिली पावणेदोनशें रुपयांची हुंडी पटविली. उपाध्येबुवांजवळ आम्हीं प्रथम उक्ते पन्नास रुपये देण्याचा ठराव केला होता. पण त्यांनीं आमच्याकरितां केलेला एकंदर खर्च, त्यांचें व त्यांच्या कुटुंबियांचें आमच्याशीं आपुलकीच्या नात्यानें वागणें व त्यांची मागणी या गोष्टी लक्षांत आणून त्यांना आम्हीं पाऊणशें रुपये दिले. आम्ही तिन्ही माणसें त्या प्रांतांत एकदांच जेवीत असून तें जेवण उपाध्यांकडेच असे. सायंकाळीं दूध, फराळ व चहा हे आमच्या खर्चानें आम्ही करीत होतों.

या गांवची लोकस्थिति साधारण सुखी दिसते. बाजार, दुकानें व राहणी या गोष्टी तालुक्याच्या मोठ्या गांवाप्रमाणें भासतात. गांवांत यमुनेच्या पाण्याचे नळ घरोघर आहेत. भाषा अस्सल हिंदुस्तानी आहे. मुसलमान वस्ती बरीच आहे पण नुसत्या वर्णावरून हा हिंदू किंवा हा मुसलमान हे ओळखतां येत नाहीं.

भाजीपाला व दुधदहीं आणि धान्य या गोष्टी आम्हा मुंबईकडील राहाणारांस स्वस्त वाटतात. पण ते लोक हल्लीं चौपट महागाई झाली आहे म्हणून ओरडतात. जुगार खेळणें व भांग पिणें हीं दोन व्यसनें या प्रांतांत फार दिसतात. आम्ही दिपवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं येथें उतरलों. आपलेकडील व्यापारी या दिवशीं वहीपूजन करितात. पण तिकडे घरोघर मातीच्या रंगीत चित्रांचें गोकूळ करून त्याची पूजा

करितात. आमच्या भटजींच्या घरींही ही पूजा व हा महोत्सव होता. त्यांनीं सायंकाळीं स्नान करून त्या गोकुळाची षोडषोपचारें पूजा केली. इकडच्या सारखाच बत्ताशांचा प्रसाद वाटला. मलाही हळदीकुंकवास अगत्यानें बोलावून तें दिलें.

आमची बलिप्रतिपदा व भाऊबीज प्रयागांतच झाली. भाऊबिजेच्या दिवशीं सायंकाळीं, आम्ही प्रयागाहून काशीस जाण्यास निघालों. त्या वेळीं आमच्या पहिल्या तिकिटांचा आम्हांस उपयोग झाला नाहीं. याचा उल्लेख पूर्वीं 'प्रयाण' प्रकरणांत आलाच आहे. प्रयागापासून पांच मिनिटें लागणाऱ्या चालीच्या अंतरावर बेंगाल अॅण्ड् नॉर्थ् वेस्टर्न रेलवेचें झूसीब्रीज नांवाचें स्टेशन लागतें या रेलवेची ही छोटी लाईन असून डबेही लहानलहान आहेत. ही गाडी अलाहाबाद सिटींतून निघते. हिचें दुसरें स्टेशन झूसीब्रीज हें आहे. येथून काशीचें तिकीट एक रुपाया पांच आण्यांस मिळतें. आमचे उपाध्ये श्री. भागवत यांची जाहिरात त्रिस्थळी यात्रा करून देण्याची आहे. त्यामुळें पुढें काशी व गया येथील उपाध्यांची सोय तेच करितात आम्हांस ते काशीपर्यंत पोंहोंचविण्यास आले. तारीख २७ ऑक्टोबर १९२७ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां प्रयागचें झूसीब्रीज स्टेशन गांठून, प्रयाग राजास वंदन करून आम्ही गाडींत बसलों.

ॐ

## प्रकरण १० वें.

# मोक्षपुरी काशी.

काशीपुरी, काशीविश्वेश्वर, गंगा वगैरे देवदेवतांची व काशी क्षेत्राची महति हजारों भाविकांनीं हजारों वर्षांपूर्वी वर्णिलेली आहे. काशीखंड नांवाचा पौराणिक ग्रंथ फक्त काशींतील देवदेवतांच्या स्तवनानें भरलेला आहे. हल्लीं लहान मुलांच्या शाळांतूनही काशीपुरींतील घाटांचे चित्रपट व देखावे दाखविले जातात. अशा या अवर्णनीय, अद्वितीय व महत्तम स्थळांचें वर्णन आपण कांहींच न करितां काशीविश्वेश्वरास नमस्कार करून आपली इटकुली-मिटकुली गोष्ट येथेंच संपवावी, असें मला वाटत होतें पण " मूकं करोति वाचालं ! " ही ज्याची कृपा त्या विश्वेश्वराच्याच मनांतून, " मद्भक्ता यत्र गायंति। तत्र तिष्ठामि नारद।" या त्याच्याच वचनाप्रमाणें, त्याची वेडी-वांकुडी सेवा व स्तुति मी यथामति करावी अशी त्याची इच्छा असल्याचें माझी अंत:स्फूर्ति मला स्वस्थ बसूं देत नाहीं,

यावरून वाटतें. म्हणून त्या विश्वेशाच्याच प्रेरणेनें मी आमच्या काशी क्षेत्रांतील वास्तव्याचें निवेदन करितें.

गाडींत बसल्यापासून सव्वातीन तासांनीं आम्ही बनारस कॅन्टोन्मेंट स्टेशनावर उतरलों. स्टेशन बरेंच मोठें दिसलें पण रात्रीची वेळ असल्यामुळें आम्हांस तें नीटपणें पाहाण्यास सांपडलें नाहीं. एक--दोन जिने चढून व उतरून आम्ही स्टेशनाच्या बाहेर आलों. अलाहाबाद प्रमाणेंच येथेंही गाडया व एक्के दिसले. आम्ही आठ आण्यांस एक, या प्रमाणें दोन एक्के काळभैरवाच्या देवळापर्यंत भाडयानें ठरवून त्यांत बसलों. सुमारें पाऊण तासानें म्हणजे रात्रीं १० वाजतां आम्ही काशी नगरीच्या वेशीवर गेलों.

काशी गांवांतील रस्ते फार अरुंद व गल्ल्यागल्ल्यांतून आहेत. हे रस्ते फरसबंदी आहेत पण त्यांची रुंदी मात्र तीन--चार फूटच भरेल. या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस चार--चार पांच--पांच मजली अशा उंच--उंच हवेल्या आहेत. या फार वर्षांपूर्वी बांधलेल्या दगडी इमारती आहेत.. त्यामुळें गाडया गांवांत येत नाहींत. प्रवासी उतरण्याचे ठिकाणीं त्यांचें सामान ने--आण करण्यास मजूर पुष्कळ मिळतात. रात्रीच्या काळोखांत गल्ल्यागल्ल्यांतून ‘ आपण कोठवर आलों व कोठें जात आहों. ’ हें नवख्या इसमास समजत नाहीं.

काशीसारख्या मोठ्या शहरांत तेथील म्युनिसिपालिटीनें उजेडाकरितां भरपूर दिव्यांची सोय न करितां कोठेंतरी एकादा मिणमिण करणारा दिवा चमकत ठेवावा, ही गोष्ट आश्चर्यजनक व खेदजनकही आहे !

आम्हांस दुर्गाघाटावरील दशपुत्रे गल्लींत श्री० गोपाळभटजी देव, यांच्याकडे जावयाचें होतें. हें ठिकाण काळभैरवाच्या देवळापासून सुमारें अर्धा मैल लांबीवर असावें. तेथपर्यंत आमचें सामान नेण्यास आम्हीं तीन आण्यांस मजूर केला. हे आंकडे प्रत्येक ठिकाणीं सांगण्याचें कारण इतकेंच आहे कीं, त्या योगानें तिकडील एकंदर परिस्थितीशीं आपल्याकडील राहाणीच्या मानानें तुलना करितां यावी. लवकरच आम्ही श्री० देव यांचे घरीं गेलों. त्यावेळीं रात्रीं ११ वाजले होते. सर्व सामसूम होतें. श्री० भागवत यांनीं श्री० देव यांस हाका मारून जागें केलें. ते दिवा घेऊन खालीं आले. त्यांनीं आम्हांस वाड्यांत घेऊन तीन—चार दगडी जिने चढवीत चढवीत एका खोलींत नेलें. त्यांच्या कुटुंबानें दिवाबत्तीची व पिण्याकरितां पाण्याची तजवीज केली. आम्हींही थोडें दूध पिऊन झोंपीं जाण्याची व्यवस्था करूं लागलों.

त्या उभयतां भटजींची आमच्या समक्ष काशी क्षेत्रांतील आमच्या धर्मकृत्यांबद्दल व देण्याघेण्याबद्दल आपसांत बोलणीं होऊन, श्री० भागवत यांनीं आमचा निरोप घेतला. थोड्या वेळानें प्रयागाकडे जाणाऱ्या गाडींतून जाण्यास ते मार्गस्थ झाले. नवीन उपाध्ये श्री० देव यांनींही आम्हांस आराम करण्यास सांगून तेही उठले.

त्या वेळीं रात्रीं १२ वाजले होते. पुष्कळ दिवसांची इच्छा आज सफळ होऊन, आपलें अंग काशींतील धरणीवर पडलें, म्हणून आनंद मानीत व त्या विश्वेश्वराचें ध्यान करीत आम्ही निद्रावश झालों.



## प्रकरण ११ वें.

# काशींतील धर्मकृत्यें.

काशींतील बहुतेक विधि पुरुषांचा आहे. स्त्रियांस स्नान, दान व देवदर्शनें एवढींच कृत्यें करावीं लागतात. पुरुषांना मात्र प्रथम क्षौर व नंतर कमींतकमी बारा श्राद्धें तरी करावीं लागतात. श्राद्ध हें या क्षेत्रीं मुख्य आहे. "**पहिलें तीर्थ श्राद्ध, मग पांच पंचकोशींचीं श्राद्धें, पुढें पांच पंचतीर्थांचीं श्राद्धें आणि बारावें पिशाच्च-मोचन श्राद्ध,**" हीं बारा श्राद्धें झाल्यावर काळभैरवाष्टक व त्याचे ब्राह्मण, काशीविश्वेश्वरास रुद्राभिषेक, ब्राह्मण व सुवासिनी भोजन हीं मुख्य धर्मकृत्यें आहेत. ऐपत असेल तर मंत्र-जागर, काशी-विश्वेश्वरास महापूजा, लघुरुद्र किंवा महारुद्रही करितात.

सर्व शाखांच्या ब्राह्मणांचा गंभीर व चित्ताकर्षक वेदघोष ऐकून मनास उल्हास वाटतो. काशींत सर्व वेद अद्याप प्रचलित असून त्यांत निष्णात असे श्रोत्रिय तेथें आहेत. आसेतु-हिमा-

उय येथील पंडितांचा शास्त्रनिर्णय शिरसावंद्य मानतात. या काशींतच बुद्धानें आपला धर्म प्रथम प्रस्थापित केला. कुमारिल भट्टानें वैदिक कर्मकांडांचा येथेंच उद्धार केला. श्रीशंकराचार्योंनीं आपला अद्वैत ब्राह्मधर्म येथेंच स्थापिला. रामशास्त्री प्रभुणे यांनीं आपली तेजःपुंज विद्वत्ता येथेंच संपादन केली. त्रिकाल स्नान करणारे योगी, आजमितीसही पर्णकुटिकेंत निर्लोभ वृत्तीनें राहाणारे साधु, परंपरागत रूढी चालविणारे कर्मठ इत्यादि सत्पुरुषमालिकेंत गोंवण्यास योग्य अशा वृत्तीचे लोक येथें आहेत. जपी, तपी, संन्यासी, गोसावी व बैरागी या वृत्तीचे लोकही येथें बरेच दिसतात. पंडित मालवीय यांनीं स्थापन केलेली हिंदू युनिव्हर्सिटी येथील प्राचीन ज्ञानांत अर्वाचीन भौतिक शास्त्राच्या ज्ञानाची भर घालीत आहे. या धार्मिक क्षेत्रांतील धर्मकृत्यांपासूनच वरील गोष्टी निर्माण झाल्यामुळें त्यांचा समावेश या धर्मकृत्यांत मीं केला आहे.

सर्व क्षेत्रांत 'गंगाभेट' हा पहिला विधि ठरलेलाच आहे. आणि तो स्त्रियांस, पुरुषांस व मुलां-बाळांसही करावा लागतो. आणि त्यापूर्वी गंगापुत्रांना नारळ, दक्षिणा वगैरे प्रत्येकास द्यावी लागते.

दुसरे दिवशीं सकाळीं ७ वाजतां आह्मी भटजींबरोबर गंगेवर गेलों. अहाहा! काय त्या वेळची गंगेची अवर्णनीय शोभा वर्णावी ! पयःफेनधवल असें तें गंगेचें विस्तीर्ण पात्र, तिच्या त्या निरनिराळ्या घाटांवरील नाना जातींच्या स्त्री-पुरुषांचा

घोळका, परतीराकडून भाजीपाला, फल-पुष्पें व मनुष्यें यांसह येणाऱ्या नावा, 'जय-गंगे,' 'जय-भागीरथी,' 'जय-माताजी,' असे शब्द-निनाद करीत गंगेंत उड्या मारणारे स्नानेच्छु, गंगेची पूजा करून तींत सोडलेले फिरते दिवे, संकल्प सांगतांना तारांबळ उडालेले गंगापुत्र, जातां जातां घाटांवरील शिवलिंगांवर थोडें पाणी ओतून व गंधफूल वाहून धांदलीनें पुढें जाणाऱ्या स्त्रिया, तसेंच कोणाच्या कडेवर भरलेली घागर, तर कोणाच्या कडेवर मूल, तर कोणाच्या कडेवर ओल्या वस्त्रांचे पिळे, या प्रमाणें घाई-घाईनें जाणारा स्त्रियांचा घोळका, इत्यादि प्रकार पाहून कोणाचें मन सुप्रसन्न व उल्हसित होणार नाहीं ?

चक्र-पुष्करिणी हें येथील मुख्य तीर्थ आहे. श्रीविष्णूनें आपलें चक्र-मारून हें तीर्थ निर्माण केलें. शंकरांनीं त्यांत आनंदानें नृत्य केलें. त्यावेळीं त्यांच्या कानांतील मणी त्यांत पडला. त्यामुळें या तीर्थापासून निघालेल्या प्रवाहास 'मणि-कर्णिका' असें नांव पडलें. चक्र-पुष्करिणी या तीर्थांत चिखल व शेवाळ फार आहे. किनाऱ्यालगत शेवाळ दूर करून गंगापुत्र येथें मार्जनस्नानानें गंगाभेट करवितात. मणिकर्णि-केचा प्रवाह याच तीर्थांतून निघून गंगेच्या विशाल पात्रांत समाविष्ट होतो. तेथील गंगेच्या भागास मणिकर्णिका हेंच नांव असून तेवढ्या भागावरील नदीच्या घाटास मणिकर्णिका--घाट असेंच नांव आहे. चक्र-पुष्करणींतून आल्यावर मणिकर्णिकेंत स्नान करून तिच्याच घाटावर क्षौर करवितात. पुन्हा स्नान करून शुद्ध झाल्यावर मग देवदर्शनास जावयाचें असतें.



## प्रकरण १२ वें.

# श्रीकाशीविश्वेश्वर दर्शन.

संकल्पपूर्वक मणिकर्णिकेंत स्नानें झाल्यावर घाटा-घाटांनीं आम्ही श्रीविश्वेश्वराच्या दर्शनास गेलों. जातांना काशींतील पवित्र मानलेली स्मशानभूमि, सत्वधीर व पुण्यश्लोक राजा हरिश्चंद्र यास ज्या डोंबानें विकत घेतलें, त्याच्या वंशजांचें घर व हरिश्चंद्र-घाट हीं स्थळें आमच्या भटजींनीं आम्हांस दाखविलीं. देवळाच्या मुख्य दरवाजांत गेल्यावर तेथील पटांगणांत कांहीं विभूतिमंडित जटाधारी साधु, आपल्यापुढें शिवलिंगें मांडून त्यांची ध्यान-धारणा व पूजा-अर्चा करण्यांत निमग्न झालेले दिसत होते. प्रत्येकाच्यापुढें एक लहानसें तबक होतें. भाविक यात्रेकरू त्यांत जातां-येतां पै-पैसा टाकीत होते. पुढें एक मोठा लाल दगडाचा नंदी आहे. याचें तोंड पूर्वींच्या काशीविश्वेश्वराच्या देवळासमोर आहे. मुसलमानी अमलांत

पूर्वीचें देऊळ भ्रष्ट झालें व तेथें मशीद उभारली. त्यावेळीं भक्तांनीं देवाची करुणा भाकिली. देवास दया येऊन तो मुख्य पुजाऱ्याच्या स्वप्नांत आला व त्यास दृष्टांत झाला कीं, "मी मणिकर्णिकेंत आहें, तूं प्रथम बुडी मारतांच मी तुझ्या हातात येईन. तुह्मी देऊळ बांधून ठेवा व गाभाऱ्यांत ज्या ठिकाणीं कापूर पेटेल त्या ठिकाणीं माझी स्थापना करा. कापूर गाभाऱ्यांत सर्वत्र पसरा. तो आपोआप पेटेल !" अशी आख्यायिका आहे. या देवळाचा गाभारा चतुष्कोणी पण गोलाकार आहे. देवाची पिंडी मधोमध नसून ती वरील दृष्टांताप्रमाणें एका कोपऱ्याच्या जवळ आहे. पिंडींतील शिवलिंग दोन विती उंचीचें भरेल, त्याचा आकार खालपासून वरपर्यंत निमूळता आहे. पिंडी सोन्याचांदीनें मढविलेली आहे. गाभाऱ्यावरील घुमट व कळस हे सोन्याच्या पत्र्यानें मढविलेले आहेत. पंजाबचे सिंह महाराजा रणजित-सिंग यांनीं हें आपलें चिरकालचें स्मारक या सोन्याच्या पत्र्यांनीं करून ठेविलेलें आहे. सकाळच्या बालार्क किरणांनीं जेव्हां हा भाग तळपत असतो, तेव्हां जरी डोळे दिपून जातात तरी हा चमत्कृतिजनक देखावा पहावासाच वाटतो !

आवारांत प्रथम मुक्ति-मंडप लागतो. त्यांतच 'ज्ञान-वापि' हें तीर्थ आहे. हें तीर्थ पूर्वी 'जटिल' नांवाच्या योग्यानें-देवाजवळ पाणी नसल्यामुळें-त्रिशूळ मारून उत्पन्न केलें. शंकरांनीं त्यास 'ज्ञान-वापि' हें नांव दिलें. यांत स्नान केल्यानें मनुष्य ज्ञानी होऊन तो मोक्षास जातो. असें याचें वर्णन



## प्रकरण १४ वें.

# काशींतील विशेष गोष्टी.

अनादि काळापासून सांप्रत कालपर्यंत काशीची महती भाविक हिंदूंच्या अंत:करणांत वास्तव्य करीत आहे. आधुनिक कालांत ज्यांना परमेश्वरच दिसत नाहीं, त्यांची गोष्ट निराळी. पण हिंदू-धर्माचा जिवंत चिवटपणा ज्यांना पाहावयाचा असेल, त्या सनातन धार्मिकांस काशी हें महत्पूज्य स्थळ वाटल्यावांचून राहाणार नाहीं. पूर्वींच्या राजे रजवाड्यांनीं व धनिकांनीं येथें आपलें नांव यावच्चंद्र–दिवाकरौ राहावें, म्हणून घाट, देवालयें, अन्नछत्रें व सदावर्तें ठेविलीं असून, तीं अद्याप चालू आहेत. प्रत्येक अन्नछत्रांत जरी एक दिवस जेवलें, तरी सर्व वर्षांत पुन्हां त्या छत्रांत यावयास नको एवढीं अन्नछत्रें या महागाईच्या काळांतही चालू आहेत. ब्राह्मणांचें सहस्र–भोजन येथें फक्त इतिहासप्रसिद्ध नाना फडणीसांच्याच वाड्यांत दोन दिवसांत घालतां येतें.

काशीचा बाजार व त्यांतील भरगच्ची मालाचीं दुकानें पाहण्यासारखीं आहेत. हुंड्या पटविणाऱ्या पेढ्या येथें पुष्कळ आहेत. रेशमी व जरीचीं मौल्यवान वस्त्रें येथें नामांकित तयार होतात. सुगंधी अत्तरें, सोन्याचांदीचे दागिने, हिरे-माणकें, पितळेचीं-भांडीं व देवांच्या मूर्ति या विषयीं या शहराची प्रसिद्धि आहे. रुद्राक्ष, स्फाटिक, नारळाचे पोहे व उसाच्या गंडेऱ्यांचा मुरंबा हे जिन्नस येथें चांगले मिळतात.

काशीविश्वेश्वराचे दर्शनास कोणत्याही ऋतूंत व केव्हांही गर्दीच असते. पण आम्ही दुसऱ्या दिवसापासून कार्तिक स्नानाकरितां पहाटेस, गंगेवर स्नानास जाणाऱ्या स्त्री-पुरुषांबरोबर जात होतों. आणि स्नान करून प्रथम काशी-विश्वेश्वराच्या दर्शनास जाण्याचा क्रम ठेवल्यामुळें दर्शन चांगलें घडत असे. काशी-विश्वेश्वराचें लिंग हें बारा जोतिर्लिंगांपैकीं असून, तेथें लिंगास स्पर्श करण्यास ओवळे, स्त्रिया व शूद्र ह्यांस प्रत्यवाय नाहीं. काशीनाथास अर्पण केलेले वसु व गाई ह्याच क्षेत्रांतील गल्लयांतून व बाजारांतून अगदीं निर्धास्तपणें फिरतात. 'काश्यां मरणान्मुक्तिः' अशी धर्मभावना असल्यामुळें येथें केवळ 'मरण यावें व आपलीं हाडें पवित्र गंगानदींत पडावीं' या हेतूनें पुष्कळ वृद्ध येऊन राहातात. काशी ही मोक्षदायक सप्तपुऱ्यांपैकीं शंकरांनीं श्रेष्ठ मानिलेली पुरी म्हणजे नगर आहे. या सप्त पुऱ्यांचीं नांवें: '॥ अयोध्या,

मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका । पुरी, द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायकाः ।। ' अशीं आहेत.

रात्र तेथें दिवस, उजेड तेथें अंधार, सज्जन तेथें दुर्जन या परस्परविरोधी तत्त्वानें जग भरलेलें आहे. त्याचप्रमाणें काशी येथें सज्जनांस मागें सारणारे उचले, चोर व खिसेकापू यांचा भरणा फार आहे. ते ' काशीचे गुंडे ' या नांवानें प्रसिद्ध आहेत. एकेकाळीं त्यांच्या शौर्यादि गुणांचा विकास झालेला होता. राजा चेतसिंगाचे देह--संरक्षक या गुंड्यांपैकींच होते. त्या वेळीं सैन्यांत यांची भरती प्रामुख्यानें होई. आतां युद्धकाल संपला व यांत्रिक शक्तीमुळें उद्योगधंदेही बसले. त्यामुळें त्यांची बेकारी वाढत जाऊन त्यांच्या मूळच्या शौर्य--धैर्यादि सद्गुणांचें परिवर्तन लुच्चेगिरी व भामटेपणा या दुर्गुणांत झालें.

कालाष्टकाचें ब्राम्हणभोजन घालून व उपाध्यांची संभावना करून आम्ही बनारस येथील पावणेदोनशें रुपयांची इम्पिरियल बँकेवरील हुंडी पटवून तारीख ३० ऑक्टोबर १९२७ रोजीं दुपारीं साडेतीनच्या गाडीनें गयेस जाण्यास निघालों. तांग्यांत बसतांना श्रीकाशीविश्वेश्वरास " पुनर्दर्शन दे. " असें म्हणून अनन्य प्रार्थना केली. काशीस आमचा जवळ--जवळ दीडिशें रुपये खर्च झाला. काशी गांवापासून ईस्ट इंडिया रेलवेचें " काशी " स्टेशन तीन मैल आहे. या स्टेशनावर आम्ही दुपारीं तीन वाजतां येऊन थडकलों.

काशीकडील मजूर, गाडीवान व नावाडी, हे लोक ठरावा-प्रमाणें पैसे घेऊन खेरीज वर इनामही मागत असतात. जितके पैसे

काढतां येतील तितके काढावयाचे हाच त्यांत त्यांचा हेतु असतो. कांहीं न दिल्यास मग कुर--कुर करीत निघून जातात. आलांस ठिकठिकाणीं हाच अनुभव आला. ई. आय्. रेलवेच्या बहुतेक मोठ्या स्टेशनांचे प्लॅट्फॉर्म् फारच लांब आढळतात. 'काशी' स्टेशनाचा प्लॅट्फॉर्म् असाच मोठा होता.

आम्हांस ज्या गाडीनें गयेस जावयाचें होतें, ती डेराडून-पासून निघणारी एक्स्प्रेस, थेट कलकत्त्यास जाणारी होती. या गाडीसंबंधानें निघतांना आम्ही आमच्या भटजींजवळ चवकशी केली होती. परंतु ते कर्मठ ब्राह्मण होते. त्यांना या गाड्या–घोड्यांचीं माहिती तितपतच होती. असें आम्हांस पुढील अनुभवानें कळलें. त्यांनीं " ही गाडी बनारसहून सुटते. बनारस-पासून काशी हें दुसरें स्टेशन असल्यामुळें जागा विपुल असते. "वगैरे प्रकारची माहिती दिली होती.

आमचेजवळ गयेचीं तिकिटें होतीं. पण तीं मोंगलसराई स्टेशनापासून चालणारीं होतीं. काशीपासून मोंगलसराई हें ७ मैल अंतरावरील दुसरें स्टेशन आहे. या अंतराचे तिसऱ्या वर्गाचे तिकिटास दोन आणे पडतात. प्लॅट्फार्मावर या गाडीनें जाणारे प्रवासी फार दिसले. " गाडींत चढतांना उतारूंचे खिसे कापले जातात. पैसा–अडक्यास जपा. " असें स्टेशना-वरील पोलीस प्रवाशांस सांगत होते. त्या पोलिसांजवळ विशेष चवकशी करितां आम्हांस असें कळलें कीं, " या गाडींत अतिशय गर्दी असते. बलुची, पठाणी व पंजाबी या जातींचा

भरणा फार असतो. तिसऱ्या वर्गांत तर जागा मिळत नाहींच, पण दुसऱ्या वर्गाचे लोकही येथें एकेक दिवस खोटी होतात. प्रवाशांचे खिसे कातरून चोऱ्या झाल्या नाहींत असा येथें एकही दिवस जात नाहीं." पोलिसांनीं दिलेली ही माहिती ऐकून प्रथम आम्हांस वाटलें कीं, "आपण परमुलखांतले पाहून यांचा कांहींतरी पैसे खाण्याचा हा कावा असावा. तरी पण न जाणों, आपण सावध राहावें, हें बरें." असा विचार करून आम्ही सामान चढवून देण्यास हमाल ठरविला व पोलिसांसही गाडींत बसवून दिल्यास कांहीं पान-सुपारीस देऊं, म्हणून सांगितलें. हमालानें आठ आणे व पोलिसांनींही आठ आणे घेण्याचें ठरवून आमचें म्हणणें कबूल केलें. गाडी स्टेशनावर आली. ती इतकी खिच्च भरली होती कीं, गाडींत पाय ठेवण्याससुद्धां जागा कोणत्याही डब्यांत नव्हती. जेमतेम त्या पोलिसांच्या मदतीनेंच आम्ही एका डब्यांत चढलों. बसण्यास किंवा सामान ठेवण्याससुद्धां जागा नव्हती. उरा-पोटाशीं व डोक्यावर आम्हीं आमचें सामान ठेविलें होतें. गाडी चालू झाली. आम्हा दोघीजणींस निव्वळ टेकण्यापुरती कशी तरी जागा मिळाली. तिकडे ट्रंक घेऊन उभेच राहावयाचें होतें. इतक्यांत तीन-चार इसम "आपले खिसे कापले गेले." असें ओरडूं लागले. कोणी म्हणेः-"माझ्या कोटाच्या खालीं जाकीट होतें, त्याच्या आंतील पोटखिशांत पाकीट होतें, त्यांत दीडशेंच्या नोटी होत्या. तेवढाच खिसा

नेमका कापला गेला." एका बडोद्याकडील इसमाचें त्याच्या खिशांत सर्वस्व होतें, तो "आपण साफ बुडालों, पुढच्या स्टेशनावर उतरून भीक मागितल्यावांचून इलाज नाहीं." असें सांगू लागला. अशी ओरड झाल्यामुळें जो तो आपले खिसे चाचपूं लागला. तेव्हां सात–आठ जणांचे तरी त्या एका डब्यांत खिसे कातरल्याचें व ते पैसे गेल्याबद्दल हळहळत असल्याचें आढळून आलें. या गडबडींत तिकडच्याही कोटाच्या आंतील खिसा, तिकडे उभे असतांनाच कापला गेला होता. पोलीसांच्या अगोदरच्या सूचनेनें जर आम्ही सावध झालों नसतों, तर आम्हांवरही वरील लोकांप्रमाणेंच परदेशांत संकट आलें असतें! तरीही त्या खिशांत पैशांचें पाकीट, गयेचीं तिकिटें व वर--खर्चापुरते थोडे पैसे इतकें होतेंच. पण आपल्यापेक्षां जास्त दुःखितांची स्थिति आमच्या डोळ्यांपुढें होती, त्यामुळें गयेस उतरल्यावर तिकिटांबद्दल काय प्रश्न पडेल, तोच सोडविण्याच्या फिकिरींत आम्ही होतों. त्या डब्यांत पंडित लक्ष्मण नारायण गर्दे, संपादक, श्रीकृष्णसंदेश, कलकत्ता, हे सद्गृहस्थ बसले होते. त्यांनीं तिकडच्याजवळ आमची चवकशी केली. तिकिटांचे नंबर तिकडच्या नोटबुकांत टिपलेले होते. तें पाहून त्यांनीं आम्हांस बरेंच आश्वासन दिलें.

मोंगलसराई स्टेशनावर गाडी येतांच आणखी ७।८ पठाण आमच्या डब्यांत घुसले. त्या धटिंगणांनीं आपणांस जागा मिळविण्याकरितां बसलेल्या प्रवाशांजवळ दांडगाई सुरू केली. तिकडे

तर अद्याप उभेच असावयाचें होतें. पण त्या पठाणांच्या दांडगाईस भिऊन आम्हीही दोघीजणी उभ्या राहिलों. त्याप्रसंगीं श्री. गर्दे यांनीं आपण होऊन मला त्यांच्या जागेवर बसण्यास सांगितलें व आपण उभे राहिले. सज्जनांचें सौजन्य कोठेंही दृग्गोचर होतेंच. अखेरीस त्यांनींच त्या पठाणांची व इतर प्रवाशांची समजूत घालून सर्वांसच बसण्याकरितां थोडथोडी जागा करून दिली. श्री. गर्दे हे बहुभाष असून त्यांस पठाणी, बंगाली, मद्रासी वगैरे भाषा अवगत होत्या, असें दिसलें. हिंदुस्तानी, इंग्रजी व मराठी या भाषा तर त्यांच्या नित्य व्यवसायांतीलच होत्या. गयेस पोंहोंचेपर्यंत या सद्गृहस्थांनीं स्वतः हाल सोसून विश्व--बंधुत्त्वाचें खरें नातें दाखविलें !

एकंदरींत आम्हांस हा १३४ मैलांचा या गाडीचा ५ तासांचा प्रवास अतिशय कष्टद व ताप--दायक झाला. खिसे कातरण्याचीं ठकसेनाच्या गोष्टींसारखीं चोरीचीं कामें निंद्य तर खरींच. पण तीं दिवसाढवळ्या, प्रवाशांनीं गच्च भरलेल्या गाडींत, नेमकीं पैसे असलेल्या ठिकाणींच करणारांचें चातुर्य व धाडस हे गुण पाहून त्यांची तारीफ करावी लागते. मागें सांगितलेले **'काशीचे गुंडे'** हे या चौर्य विद्येंतील पुढारी आहेत, असें म्हणतात. एकंदरींत आमरण ध्यानांत राहाणारा हा प्रवास झाला.



## प्रकरण १५ वें.

# श्रीविष्णुगया.

काशीहून निघण्यापूर्वी आमच्या भटजींनीं गयेंतील उपाध्ये श्री० आचवल यांस तार केली होती. त्याप्रमाणें त्यांच्याकडून गया स्टेशनावर आम्हांस घेण्यास त्यांचे गुमास्ते श्री० परशुरामभटजी सिधये हे आले होते. त्यांच्या बरोबर श्री० जोगळेकर नांवाचे त्यांचे स्नेही होते. ते या ई. आय्. रेलवेंत मोठ्या हुद्यावर आहेत. गाडींतून उतरतांना आम्हीं श्री० गर्दे यांचा आभारपूर्वक निरोप घेतला. प्लॅट्फार्मवरून येतांना आमचा खिसा कापल्याचें व तिकिटें गेल्याचें आम्हांस घेण्यास आलेल्या इसमांना आह्मीं सांगितलें. तिकिटांचे नंबर टिपलेले असल्यामुळें व श्री० जोगळेकर हे बरोबर असल्यामुळें आम्हांस

हरकत झाली नाहीं. उपाध्ये भिथये, यांच्या सांगण्यावरून आम्हीं गया स्टेशनावरील रेलवे पोलिसांत आमच्या चोरीची फिर्यादही दाखल केली.

बारा आण्यास गाडी ठरवून आम्ही गया क्षेत्रांत " चांद-चौरा " या गाडी तळावर उतरलों. स्टेशनापासून हें ठिकाण चार मैल आहे. काशीप्रमाणें येथेंही गाड्या गांवांत जात नाहींत. फरसबंदीच्या लहान गल्या—गल्यांतूनच गांवांत प्रवेश करावा लागतो.

आम्हांस देवघाटावरील आमच्या उपाध्यांच्या घरीं जावयाचें होतें. हें घर चांदचौऱ्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर होतें. सामान ने--आण करण्यास येथेंही काशीप्रमाणेंच मजूर मिळतात. मजुरास दोन आणे देण्याचें ठरवून आम्ही निघालों. रात्रीं ११ वाजतां आम्ही तेथें पोंहोंचलों.

आम्हांस येथें उतरण्यास जें घर दिलें होतें. त्याचें बांधकाम सुरूच होतें. फक्त यात्रेकरूंकरितां सार्वजनिक वर्गणीनें हें घर बांधलें जात होतें. जास्तींत जास्त किती यात्रेकरू या घरांत ठेवावे, याबद्दल म्युनिसिपालिटीचा त्या घरावर निर्बंध होता. अशीं वसती-गृहें एक प्रकारानें चांगलीं वाटतात. पण तीं बांधतांना प्रवाशांच्या सुख--सोईची विशेष काळजी घ्यावयास पाहिजे. तशी या घराची घेतली नाहीं, असें म्हणावें लागतें. कारण या ठिकाणची हवा सर्द आहे. यात्रेकरू सकाळींच नदीवर थंडानें स्नानें कारितात. अशा स्थितींत या इमारतीस बैठकीच्या जागेस सुद्धां वापरलेलें सिमेंट, म्युनसिपालिटीच्या सॅनिटरी खात्यास कसें पसंत पडलें, हें समजत नाहीं ! यात्रेकरू म्हणजे सुख-

वस्तु राहाणारा घरंदाज नव्हे, त्याच्याजवळ कपडालत्ताही अगदीं जरूरीपुरताच असतो. त्यामुळें या सिमेंटच्या जागेवर बसण्या-उठण्यानें त्यास सर्दीचे विकार एक--दोन दिवसांत होतात. आम्हांस तरी हा अनुभव दोन दिवसांत आला.

गयेस येतांना पूर्वी पुनःपुना नदीचें दर्शन, स्नान व तीर्थ-विधि करावा लागत असे. रेलवेमुळें हें तीर्थ हल्लीं साधु-संतांवांचून इतरांस घडत नाहीं. हा पूर्वीचा मगध देश होय. जरासंधाचें हें राज्य होतें. त्याची राजधानी राजगृह ही येथून २५ कोशांवर पाटणा जिल्ह्यांत आहे. बहुतेक सर्व धान्यें या प्रांतांत होतात. ऊसाची लागवड बऱ्याच मोठ्या प्रमाणांत येथें होत असून त्यापासून साखर तयार करण्याचे कारखानेही तेथें आहेत. गया येथें दगडी पडघे, दगडी वाट्या व दगडी खलबत्ते चांगले मिळतात. पितळेचीं भांडीं, स्फटिक व उत्तम सूर्यकांत नांवाचे मणी येथील दुकानांत नमुनेदार मिळतात. दगडाच्या उत्तम देवमूर्तिही येथें विक्रीस ठेविलेल्या असतात.

येथून सात मैलांवर ' बुद्धगया ' नांवाचें बुद्धधर्माचें क्षेत्र आहे. तेथें बुद्धाचें मंदिर असून त्यांत बुद्धाचा पुतळा आहे. येथें बुद्ध लोकांची वस्ती बरीच आहे. येथील जुनाट अश्वत्थ वृक्ष व जगन्नाथाचें मंदिर यांचीं दर्शनें घेण्यास बरेच हिंदू लोक तेथें जातात. गयेपासून बुद्धगयेस जातां-येतां चार साडे-चार रुपयांपर्यंत गाडीभाडें पडतें. तेथें एक-दोन दक्षिणी ब्राह्मणांचींही घरें आहेत.

प्रकरण १६ वें.

# गयासुर.

गयामहात्म्याचा सारांश असा आहे कीं, " या ठिकाणीं पूर्वी गयासुर नांवाचा राक्षस होता. त्यानें फारच उग्र तपश्चर्या केली. तेव्हां सर्व देव भ्याले व ते विष्णूस शरण गेले. विष्णूनें तेथें येऊन त्यास मुक्त केलें व त्याच्या इच्छेप्रमाणें त्यास वर दिला कीं,—" तुझ्या शिरावर जे कोणी श्राद्ध करून पिंडदान करतील, त्यांचे पितर मुक्त होतील. विष्णूनें असा वर दिल्यावर गयासुराचें शरीर तेथें पडलें. गयासुराचें शरीर पांच कोस लांबीचें असून त्याचें डोकें एक कोस होतें. विष्णूच्या वराप्रमाणें प्रथम गयासुराच्या डोक्यावर देवांनीं श्राद्ध व पिंडदान करण्यास प्रारंभ केला. पण त्याचे शिरास स्थैर्य नसल्यामुळें तें हालत होतें. त्यावेळीं एका पुण्यवती साध्वीची वरप्राप्त शीळा त्या गयासुराच्या मस्तकाच्या मध्यावर देवांनीं आणून ठेविली. तरीही तें शीर हालण्याचें राहीना. पुन्हा देव महाविष्णूकडे गेले.

तेव्हां महाविष्णु तेथें येऊन त्यांनीं आपला उजवा तळपाय त्या शिळेवर दडपून ठेविला. त्या बरोबर शीर हालण्याचें बंद होऊन गयासुराचें सर्व शरीर अचेतन झालें. पण महाविष्णूंनीं आपलें पदकमल तेथून काढूं नये व पितरांच्या मुक्तीकरितां अखेरचें पिंडदान या पदकमलावर व्हावें, असा वर गयासुरानें त्यावेळीं मिळविला. त्याप्रमाणें भगवान् महाविष्णु पादरूपानें तेथें वास्तव्य करीत असून त्यांच्यासमवेत इतर सर्व देव या ठिकाणीं पादरूपानें राहातात." असा कथाभाग आहे.

या ठिकाणचें तीर्थ फल्गुनदी व शेवटचें श्राद्धाचें ठिकाण अक्षय्य-वट हीं स्थळेंहीं गयासुराच्या शिरावरच आहेत, असें म्हणतात. येथें एकंदर विष्णुपदें अठरा आहेत. पण तीं कृत्रिम भासतात. मुख्य विष्णुपद मोठ्या माणसाच्या पावलासारखें वरील शिळेवर आपोआप उमटलेलें दिसतें.

पूर्वी रामचंद्रानें या ठिकाणीं सर्व श्राद्धेंकरून तेथील मुख्य गयावळास एक सोन्याचा व एक रुप्याचा असे दोन पर्वत आणि एक दुधाची व एक मधाची अशा दोन नद्या अक्षय्य वाहात्या उत्पन्न करून त्या दान दिल्या. तरी त्या गयावळाचें समाधान होईना. यामुळें रामास राग आला. त्यानें ते दोन्ही पर्वत पाषाणांचे बनवून नद्यांस गुप्त-रूपानें वाहाण्यास आज्ञा केली. त्यामुळें मधाची नदी गुप्त झाली. तिचा प्रवाह जेथून निघाला त्या ठिकाणास ' मधुस्राव ' हें नांव आहे. दुधाची नदी पालथी होऊन वाहूं लागली. तीच हल्लींची फल्गु नदी

असून हेंच या क्षेत्राचें तीर्थमहिम्याचें सांप्रतचें ठिकाण आहे. आम्ही या क्षेत्रीं कार्तिक शुद्ध षष्ठीस होतों. ते दिवस नद्या कोरड्या पडणारे नसून नुकताच वर्षाकाल संपल्यामुळें नद्या भरून वाहाण्याचे होते. पण आम्ही नदींत उतरलों त्यावेळीं गुडघाभर पाणीही तिच्यांत नव्हतें. म्युनिसिपालिटीचे लोक हातगाड्यांनीं जेथील वाळू भरून किनाऱ्यावर टाकीत, तेथें तेवढ्याच खाड्यापुरतें जास्त पाणी खोल होई. यामुळें स्नान करितांना या नदींतून वाळू बाहेर काढून तेवढाच खोल खाडा करून घ्यावा लागतो. पूर्वीं ही नदी दुधाची असो वा नसो, पण आम्हांस या नदीचें पाणी मात्र अगदीं दुधासारखें शुभ्र वर्णाचें दिसलें. एवढी गोष्ट मात्र खरी ! सोन्याचा पर्वत 'राम—पर्वत' या नांवानें व रुप्याचा पर्वत 'प्रेत—पर्वत' या नांवानें हल्लीं तेथें दाखवितात. त्यावर कोठें कोठें सोन्या-रुप्यासारख्या रेषा मात्र दिसतात. या ठिकाणीं गयागया, ब्रह्म-गया, विष्णुगया, रुद्रगया व काशीविश्वेश्वरगया अशा पांच गया आहेत. यांखेरीज आणखी येथील सहा गया मोक्षदायक सांगितल्या आहेत. त्यांचीं नांवें:—गयागज, गयादित्य, गायत्री, गदाधर, गया व गयाशीर. सांप्रतचे यात्रेकरू फक्त विष्णुगयें-तच सर्व धर्मविधि करितात.

---



## प्रकरण १७ वें.

# गयेंतील दर्शनें व धर्मकृत्यें.

॥ गदाधरं, विष्णुपदं, अष्टादशपदानपि ॥
॥ वन्दे अक्षय्यवटं, फल्गुं, लक्ष्मीं, गौरीं, गयेश्वरीं ॥

मागें सांगितलेली पुनःपुना नदी व फल्गुनदी यांच्यामध्यें निरनिराळ्या स्थानीं वरील ठिकाणें आहेत. अठरा विष्णुपदें ज्या ज्या ठिकाणीं आहेत, त्या त्या ठिकाणीं श्राद्धें करावीं, असें तेथील तीर्थमहात्म्य आहे. पण हल्लीं सकाळच्या गाडीनें येऊन संध्याकाळचे गाडीनें परत जाणारेच यात्रेकरू फार करून आढळतात. त्यामुळें मुख्य विष्णुपदावरच यात्रा संपते.

मुख्य विष्णुपदाचें देऊळ पुण्यश्लोक अहिल्याबाईनें बांधिलेलें आहे. सर्व देऊळ चिरेबंदी आहे. गाभाऱ्यांत एक वर्तुळाकृति कुंड आहे. त्याचा व्यास सुमारें तीन फूट असून परीघ जवळजवळ दहा फूट भरेल. या कुंडांतील शिळेवर मध्यभागीं स्वयंभू विष्णुपद उमटलेलें आहे. देवळांच्या पूर्वींच्या बांधणींत

मुख्य गाभाऱ्यांत भरपूर उजेड येण्याची सोय केलेली कोठेंही आढळत नाहीं. त्याचप्रमाणें येथीलही परिस्थिति आहे. नीट निरखून पाहिल्यावांचून हें विष्णुपद चांगलें दिसत नाहीं. रात्रीं गयावळ पूजा करितो, त्यावेळीं हें पद चंदनानें लपेटून त्यांत बोटें, शिरा व नखें वगैरे भाग दाखवून श्रीविष्णूच्या पायावरील सामुद्रिक चिन्हेंही उमटवितो. तेव्हां तेथील दीप-प्रकाशांत हें पद स्पष्ट दिसतें. त्या वेळचा षोडशोपचार पूजेचा व आरतीचा थाट फार गंभीर स्वरूपाचा असतो. याच विष्णु-पदावर पितरांस अखेरचें पिंडदान करितात. येथें पिंडदान केलें म्हणजे पितर विष्णुलोकास जातात. त्यामुळें पुन्हां पिंडदान करावें लागत नाहीं. अशी धर्माज्ञा आहे. म्हणूनच या गयेस 'पितृगया' असेंही म्हणतात. येथें पिंड लिंबाएवढे करावे असें धर्मवचन आहे. या देवळाच्या सभामंडपांत वरून पाण्याचा एक थेंब सदोदित पडत असतो. तो वाळला कीं लगेच दुसरा पडतो. आपण पाहात राहिल्यास तो पडत नाहीं. हा येथें चमत्कार आहे.

अन्य क्षेत्रांप्रमाणेंच येथेंही प्रथम गंगाभेट आहे. मात्र क्षौर नाहीं. येथें एकंदर श्राद्धें बरींच आहेत. पण त्यांपैकीं आतां अगदीं जरूर अशीं तीनच करितात. एक फल्गुनदीवरील तीर्थश्राद्ध, दुसरें विष्णुपदावर आणि तिसरें अक्षय्यवटा-वर, हल्लीं त्यांतही संक्षेप होऊं लागला आहे !

वर सांगितलेल्या दर्शनांपैकीं विष्णुपदाचे देवळांत गदाध-राची मूर्ति असून ती शंख, चक्र, गदा, पद्म अशी सायुध आहे. जवळच देवी लक्ष्मीची मूर्ति आहे. गयेश्वरी व गौरी या देवतां अक्षय्यवटावर जातांना लागतात, गौरी देवीस मंगळागौरी

या नांवानेंही संबोधितात. अक्षय्यवटावर जाण्यास दोन मार्ग आहेत. एक पूर्वीचा चढावाचा असून त्याला पायऱ्या बांधलेल्या आहेत. सुमारें पन्नास पायऱ्या चढून गेल्यावर हीं वरील देवळें लागतात. तेथून खालीं उताराचा रस्ता आहे. त्याही सुमारें पन्नास पायऱ्याच आहेत. दुसरा रस्ता हल्लीं सडकेचा झालेला आहे. फल्गुनदीपासून अक्षय्यवट सुमारें दोन मैल लांबीवर आहे.


अक्षय्यवटाचें ठिकाण किल्ल्यासारखें उंचावर बांधलेलें आहे. महाद्वारापर्यंत जाण्यास सुमारें दहा-बारा पायऱ्या चढाव्या लागतात. ह्या पायऱ्या प्रशस्त आहेत. आंतील बाजूस मध्या-वर अक्षय्यवटाचा आयताकार बांधलेला पार आहे. तेथें वडाचीं एकापुढें एक अशीं चार झाडें निरनिराळीं आहेत. त्यांचीं मुळें दिसत नाहींत. याला तिकडील भटजी ' प्रयागवट ' असेंही म्हणतात. भाविकांची श्रद्धा वाढविण्यासाठीं या वडाच्या बाजूस अनेक देव-देवतांची स्थापना केलेली आहे. तेथें पांच पांडवांच्या मूर्तिही दाखवितात. पाराच्या सभोंवार सुमारें वीस-बावीस फूट जागेवर फरसबंदी केलेली असून त्या जागेच्या सभोंवार धक्का बांधलेला आहे. या धक्कयावरून खालील नदी-प्रवाहाची व आसमंतात् भागाची शोभा चांगली दिसते. एका बाजूस धर्मशाळा आहे.

या वटच्छायेखालीं अगदीं शेवटचें श्राद्ध होतें. श्राद्ध झाल्यावर गयावळ पति-पत्नीचे हात फुलांच्या माळेनें बांधतो. यावेळीं त्या गयावळाचा " **तेरे पितर स्वरग गये** " हा आशीर्वाद घ्यावयाचा असतो. येथील गयावळ हा या क्षेत्राचा मुख्य अधिकारी आहे. उपाध्या कोणीही असो, पण वरील आशीर्वाद या गयावळाचाच घ्यावा लागतो. यावेळीं हे गया-

वळ पैशाच्या बाजूनें फार आडवितात, तरी सांप्रतकाळ त्यांसही जाणवूं लागला आहे. आपल्या उपाध्यामार्फत तजवीज केल्यास आपणांस हल्लीं कोणतीही आडवणूक होत नाहीं. या आशीर्वादानंतर गया-वर्जन करण्याचें असतें, म्हणजे कोणतें तरी आवडीचें फळ व वट-पत्रावर भोजन हें सोडावें लागतें. त्यानंतर भटजी आपणांस पुत्र, धन, भक्ति व मुक्ति या चार वरांपैकीं कोणताही एक इच्छित वर, त्या अक्षय्यवटाजवळ मागण्यास सांगतात. इतकीं कृत्यें झाल्यावर घरीं येऊन इच्छेप्रमाणें ब्राह्मण भोजन व सुवासिनी भोजन घालावें लागतें.

विष्णुपदावर कोणी भाविक षोडशोपचार पूजा करितात. कोणी तुलसीदलसह विष्णुसहस्रनाम वाहातात. कोणी पुरुषसूक्त किंवा पवमानसूक्त यांचे अभिषेक करितात अथवा करवितात. प्रत्यक्षविष्णुपदावर कोणतेंही कृत्य करण्यास आठ आणे कर प्रत्येक वेळीं द्यावा लागतो. त्याखेरीज विष्णुपदास महादक्षिणा, महापूजा, महा अभिषेक वगैरे धर्मविधि ऐपतीनुरूप करितात. विष्णुपदावर पिंड-दान केल्यावर कळसाचें दर्शन घेऊन त्यास साक्षी ठेवण्यास उपाध्ये सांगतात.

या स्थळीं आम्हांस एकंदर खर्च पन्नास रुपयांपर्यंत झाला. पुढें अयोध्या, आग्रा व मथुरा करून येण्याचा विचार होता, पण तेवढे दिवस न राहिल्यामुळें वरील स्थळें पाहाण्याचें भगवदिच्छेवर सोंपवून आम्ही ता. २ नोव्हेंबर १९२७ रोजीं इकडे परत येण्यास निघालों.



## प्रकरण १८ वें.

# सिंहावलोकन.

डेराडून एक्स्प्रेसची आठवण पक्की राहिल्यामुळें, येतांना आम्ही कलकत्ता मेलनें आलों. त्या मेलच्या इंटरच्या प्रत्येक तिकिटास गयेपासून कल्याणपर्यंतचें भाडें पस्तीस रुपये तेरा आणे पडले. हीं तिकिटें कोरीं असून, त्यावर सर्व मजकूर तिकिटें देणाऱ्या कारकुनानें त्यावेळीं इंग्रजींत लिहिला. गयेपासून कल्याण १०२७ मैलआहे. यांत पैसे जास्त गेले खरे, पण हा प्रवास मात्र सुखकर झाला. गाडींत बसल्यापासून बरोबर ३८ तासांनीं आम्ही कल्याण स्टेशनावर उतरलों. लगेच गांवांत गेलों. मी मातुश्रींच्या चरणांचें दर्शन घेऊन माझ्या प्रिय–बंधूची भेट घेतली. तो आनंदाचा दिवस तेथें घालवून दुसऱ्या दिवशीं कुर्ल्यास आम्हीं पुनरागमन केलें.

याप्रमाणें यात्रेस निघाल्यापासून तेराव्या दिवशीं आम्ही घरीं आलो. प्रत्येक तीर्थाच्या ठिकाणीं तीन दिवस तरी राहावें,

ना. ...७५...

असा नियम आहे. सांप्रतकाळीं सवडीच्या व संपत्तीच्या सीमांवीं हे नियम पाळले जात नाहींत. आम्हांसच एकेक दिवसांत शक्य असेल तो दान—धर्म करून त्याच दिवशीं पुढील ठिकाणीं जाणारे यात्रेकरू प्रयाग व गया येथें आढळले.

परमुलखांत परस्पर ओळख व प्रेम यांची वाढ एकच ध्येय असणाऱ्या यात्रेकरूंमध्यें किती जलद होते, याचा अनुभव मला गयेस आला. श्री० पटवर्धन नांवाचे प्रस्तुत दादर येथील किंग जॉर्ज शाळेंतील शिक्षक आम्हांस गयेंत भेटले. त्यांच्या कुटुंबाची व माझी तेथें एका दिवसापुरती मोठी गट्टी जमून आम्ही उभयतां जशा सख्या बहिणी वागतात, तशा वागत होतों. मुंबईकडील तुटक वृत्ति, एकाच चाळींत अगदीं शेजारीं राहाणाऱ्या बिऱ्हाडांची फक्त नांवापलीकडे माहिती नसावी, इतक्या थरास पोंहोंचलेली आहे, याचीं विशेष कारणें म्हणजे परस्परांचे भिन्न व्यवसाय व पोटाची विवंचना सारखी दुणावत असल्यामुळें वेळेचा अभाव हीं होत. या शिवाय इतर कारणेंही असतातच.

प्रत्येक तीर्थाचे ठिकाणीं पंड्यांचा त्रास मनस्वी होतो. हे आपणांस ' धर्ममार्तंड ' म्हणविणारे तीर्थोपाध्ये कित्येक स्थळीं फार निंद्य वर्तनाचे आढळतात. यांच्यापासून चार पावलें दूर राहाणेंच श्रेयस्कर असतें. आधुनिक कालास अनुसरून वागणारे महाराष्ट्रीय तीर्थोपाध्ये प्रत्येक क्षेत्रीं आढळतात. आम्हांस तिन्ही ठिकाणीं हेच तीर्थोपाध्ये असल्यामुळें फारसा त्रास झाला नाहीं

तरी त्यांतही आणखी सुधारणा पाहिजे आहेत. त्या झाल्यास या यात्रांचें कार्य अधिक सुखकर होऊन, क्षेत्रोपाध्यांच्या अनन्वित, जुलमी, त्रासदायक व गतानुगतिक कृत्यांमुळें क्षेत्रांच्या ठिकाणची उडालेली धर्म-श्रद्धा पुन्हा बसूं लागेल.

तीर्थांचे ठिकाणीं पूर्वी पाण्याचा फार त्रास असे. नदीवरून घरीं पाणी आणावें, तेव्हां पुढें स्वयंपाक करावा. पण हल्लीं सर्वत्र घरोघर पाण्याचे नळ झाल्यामुळें वरील त्रास नाहींसा झाला आहे. इंग्रजी राज्यांत या पाण्याच्या, पोष्टाच्या, तारेच्या व रेलवेच्या सोई चांगल्या झाल्या आहेत. तरी पण ईस्ट इंडियन रेलवेवरील तिसऱ्या वर्गाच्या उतारूंकरितां जेवढ्या गाड्या असावयास पाहिजेत, तेवढ्या त्या नसल्यामुळें डेराडून-एक्स्प्रेससारख्या चिकार गर्दीच्या गाड्यांतून जीव धोक्यांत घालून बसणें भाग पडतें. त्यामुळें चोऱ्यांसारखे सर्वस्वी नागविणारे संकटाचे प्रसंग नेहमीं उद्भवतात. त्याचप्रमाणें तिसऱ्या वर्गाच्या तिकिट ऑफिसांजवळ इतकी बेदाद व बेपर्वाईची स्थिति आढळते कीं, ती पाहून मनस्ताप होऊन मनास फार उद्विग्नता येते. ' तिकीट ऑफिसें चोवीस तास उघडीं असतात, ' असें म्हणतात. पण यापेक्षां बंद असलेल्या खिडक्यांचे आंत तिकिटें देणारे इसम चोवीस तास असतात, हें म्हणणें अधिक सयुक्तिक व सत्यास धरून होईल. खुद्द गयेसारख्या मोठ्या जंक्शनच्या स्टेशनावर आम्हांस हा अनुभव आला. एकतर या मोठमोठ्या स्टेशनांतून तिसऱ्या वर्गाच्या तिकिट-ऑफिसांची त्या स्टेशनाच्या मुख्य भागापासून

निराळी वांटणी झालेली असते. दूरवर धर्मशाळावजा असलेल्या या भागांत पांच–सहा ठिकाणीं तिकीट–ऑफिसें नजरेस पड- तात, आंतील बंद भागांत तिकिटें विकणारे एकमेकांशी बोलत असतात, पण खिडकी उघडून प्रवाशांची चवकशी करतील तर शपथ! कोणत्या बाजूचें तिकीट कोणत्या ठिकाणीं घ्यावें, हें पुष्क- ळांस कळत नाहीं. त्यामुळें एकाद्या खिडकीची फळी उघडतांच उतारूंच्या झुंडींच्या झुंडी, त्या खिडकीजवळ आपसांत धक्का- बुक्की करीत जातात. तिकीट घेऊन परत येतांना पुन्हा तेच हाल. अशा वेळीं तेथें अशक्त व म्हातारीं माणसें कशीं चेंगरलीं जातात, गाडी स्टेशनांत येऊनही तिकिटें न मिळाल्यामुळें, पोलिस-दादांच्या हातांत चिरिमिरी घालून, त्यांच्या किती केंविलवाण्या रीतीनें प्रार्थना कराव्या लागतात, गरीब--दुबळयांचे पैसे निष्कारण जास्त खर्च होऊन त्यांचे कसे हाल होतात, याचें हृदयस्पर्शी चित्र दयाळू व न्यायी सरकारच्या दृष्टीस अगम्य आहे काय?

असो. अलाहाबाद, काशी व गया हीं तिन्हीं शहरें त्या त्या जिल्ह्यांचीं मुख्य ठिकाणें आहेत. अलाहाबाद व काशी हे जिल्हे संयुक्त प्रांतांत येतात व गया हा जिल्हा बाहार प्रांतांत मोडतो. बाहारी लोक शरिरानें धिप्पाड, कणखर व दमदार आहेत, पण ठेंगू आकाराचे भासतात. या प्रांतांत उन्हाळा, हिंवाळा व पावसाळा हे तिन्ही ऋतु कडक असतात. दूध, दहीं, धान्य, भाजी-पाला व एकंदर राहणी चांगली व स्वस्ताईची भासते.



## प्रकरण १९ वें.

# निरोप.

क्षेत्रोपाध्ये यात्रेकरूंस 'यजमान' या बहुमानवाचक विशेषणानें संबोधितात. यात्रा झाल्यावर यजमानांस ते प्रसाद देऊन त्यांच्या वृत्तीच्या वहींत यजमानांकडून, आपण यात्रेस आल्याबद्दलचा व ह्या उपाध्यांना तेथील 'तीर्थोपाध्ये' ह्मणून मानल्याचा, लेख लिहून घेतात. प्रयागचे उपाध्ये तांदूळ, नारळ व शुद्ध भागीरथीनें भरलेलें लहान लोटीसारखें भांडें देतात. काशींत काशीविश्वेश्वराचा अंगारा, काळभैरवाचा गंडा, तांदूळ, खारका, व अन्नपूर्णा देवीची मूर्ति आणि गयेंत तांदूळ, तुळशी, सुपारी व विष्णुपद याप्रमाणें उपाध्ये यजमानांस प्रसाद देऊन निरोप देतात. या तांदुळांची गंगापूजनाच्या दिवशीं घरीं आल्यावर खीर करून ती काशी—यात्रेचा प्रसाद म्हणून वाढतात.

उपाध्ये यात्रेकरूंची बिदागी पाहून त्याप्रमाणें त्यांच्याशीं वर्तन करितात. श्री०भागवत यांचें वर्तन यात्रेकरूंशीं ममतेनें वागण्याचें आम्हांस दिसलें. त्यांच्या कुटुंबियांनींही आम्हास आपलेंसें मानिलें. पण यांतील मुख्य कारण आपली स्वत:ची वागणूकही तशीच असावयास पाहिजे, असें मला वाटतें. यात्रेकरूंनीं क्षेत्रस्थ उपाध्याशीं प्रथम आपणांस कोणतीं कोणतीं धर्मकृत्यें करावयाचीं ? त्यांस खर्च काय येणार ? याची तपशीलवार चौकशी करून आपल्या ऐपतीप्रमाणें उपाध्यांशीं पैशांचा ठराव केल्यास, तें करणें उभयपक्षींही सुखावह होत, असा आमचा अनुभव आहे. अगदीं कमींतकमी या यात्रेस शंभर रुपये तरी पाहिजेतच. यापेक्षां जास्त खर्च करितां आल्यास तो पाहिजे आहेच. हा खर्च धार्मिक बाबींत होत असल्यामुळें त्याजबद्दल मनास विषाद न वाटतां उलट समाधानच होतें व सर्व गोष्टी मनाच्या समाधानाकरितांच आपण करीत असतों.

इतर स्थळांपेक्षां एकट्या काशीचेंच महात्म्य विशेष आहे. म्हणूनच ही जरी तीन ठिकाणची यात्रा असल्यामुळें हिला "त्रिस्थळी यात्रा" असें सार्थ नांव आहे. तरी या त्रिस्थळींचा समावेश 'काशीयात्रा' या एका शब्दांतच होतो. काशी क्षेत्रास निरनिराळ्या काळीं निरनिराळीं नांवें दिलेलीं आढळतात. श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांनीं केलेल्या बारा ज्योतिर्लिंगांचे स्तोत्रांत या क्षेत्रास "आनंदवन" हें नांव आहे. अशी

आणि वरुणा या नद्यांच्या संगमावरून ह्यास ' वाराणशी ' असें नांव पडलें असावें. महानुभावी ग्रंथांत या क्षेत्रास ' ऋद्धिपुर ' हें नांव आढळतें. बनार नांवाच्या राजानें हें शहर वसविलें तेव्हांपासून यास ' बनारस ' म्हणूं लागले. मी एका पुस्तकांत असें वाचलें आहे कीं, काशीचें 'काशी' हें नांवही मनुष्यजातीचें निदर्शक आहे. " तीन हजार वर्षांपूर्वी जेव्हां उत्तर हिन्दुस्तानांत रणशूर भारत, संपन्न कोसल आणि विदेह यांचीं नांवें दुमदुमत होतीं, त्यावेळीं आर्यावर्तांत वाराणशीच्या 'काशी' लोकांची विद्वत्तेंत व कलाकुसरींत प्रामुख्यानें गणना होत होती. याच लोकांच्या नांवावरून या क्षेत्रास ' काशी ' हें नांव पडलें." हा वाचलेल्या मजकुराचा सारांश आहे. कांहींही असो. अनादि कालापासून ' काशी ' हें नांव प्रचलित असल्याचें पौराणिक ग्रंथांवरून दिसतें. हल्लीं हें क्षेत्र ' काशी ' व ' बनारस ' या दोन्ही नांवांनीं ओळखिलें जातें. या क्षेत्रांतून परत येतांना आपणांस इकडील आप्तेष्टांस व ओळखीच्या इसमांस देण्याकरितां प्रासादिक म्हणून कांहीं वस्तु आणाव्या लागतात. प्रसादाकरितां मिठाई, निदान डाळें, अंगारा व गंडे, स्त्रियांकरितां कुंकू, बांगड्या व चोळीचे खण या जिनसा घ्याव्या लागतात.


भुसावळ स्टेशन सोडल्यावर आपला परमुलखांत प्रवेश होत आहे, असें वाटूं लागतें. त्यामुळें मनावर एक प्रकारची काळजीची व भीतीची छटा उमटते ! पण पुन्हां परत येतांना

निघाल्यापासूनच " घरीं जातों, " म्हणून उद्भवणाऱ्या स्वाभाविक आनंदांत भुसावळ स्टेशन पाहातांच, " आपण आपल्या मुलखांत आलों. " ही भावना जागृत होऊन, प्रथम पडलेला मनावरील काळजीचा व भीतीचा पडदा दूर होतो, व वरील स्वाभाविक आनंदांत भर पडून, अंतःकरणांतील उल्हसित लकेर मुद्रेवर उमटल्यावांचून राहात नाहीं. जों जों पुढचा पल्ला गांठावा तों तों आपलीं मायेचीं माणसें आतां लवकर दृष्टीस पडतील असें वाटावयास लागून प्रवासाचा शीणभाग आपोआप कमी कमी होण्यास लागतो.

असो. ज्या परमेश्वराच्या कृपेनें माझ्या अंतःस्फूर्तीची प्रेरणा व ठिकठिकाणच्या नाना प्रकारच्या आठवणी या, माझ्या हातून हें लहानसें प्रवासवृत्त शेवटास जाईपर्यंत, कायम राहिल्या व माझ्यासारख्या गरीब व अल्पमति बालिकेकडून ज्यानें आपली यात्रा यथासांग करून घेतली, त्या अनादि अनंत श्रीकाशीविश्वेश्वरास मी अनन्यभावानें व भक्तियुक्त अंतःकरणानें शतशः प्रणाम करितें आणि वाचकांचाही निरोप घेतांना मी त्या भक्तवत्सलाजवळ एवढेंच मागणें मागतें कीं,:—


॥ सर्वे वै सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ॥
॥ सर्वे भद्राणि पश्यन्तु । न कश्चित् दुःखभाग् भवेत् ॥

इति॥



REFBK-0003791
REFBK-0003791

# काशींतील घाटांचा देखावा.



गंगानदींतून सायंकाळच्या वेळीं नावेंत बसून सहल करितांना गंगेच्या घाटावरील दिसणारा काशी क्षेत्राचा भाग. [ पृष्ठ.५५ ]